नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक ३१७ * * अमरावती * बुधवार, दिनांक १४ मे २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## जेकेमध्ये तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप स्वीकारार्ह नाही

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :
जम्मू-काश्मीर प्रश्नात तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप स्वीकारार्ह नाही, असे भारताने म्हटले आहे. भारत-पाकिस्तान हे प्रश्न आपापसात सोडवतील, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी सांगितले.

ते म्हणाले की, पाकिस्तानला पीओके रिकामा करावे लागेल. सर्व प्रकरणे द्विपक्षीय पद्धतीने सोडवली जातील. खरं तर, भारताच्या या प्रतिक्रियेला जम्मू-काश्मीर वाद सोडवण्याच्या मुद्द्यावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानाशी जोडले जात आहे. ट्रम्प यांनी ११ मे रोजी म्हटले होते की, 'हजार वर्षांनंतर' काश्मीर प्रश्नावर तोडगा निघू शकतो का हे पाहण्यासाठी मी दोघांसोबत एकत्र काम करण्याचा प्रयत्न करेन.'

अग्राग्रलेख
**खरीखरी..**

## असे दोन रामशास्त्री

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजीव खन्ना यांचा कार्यकाल आज पूर्ण झाला. त्यानंतर होणारे सरन्यायाधीश गवई यांनी आपण नियुक्तीनंतर कोणतेही सरकारी पद स्वीकारणार नाही. असे काही दिवसांपूर्वी जाहीर केले होते. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून आज निवृत्त झालेल्या संजीव खन्ना यांनी आपलाही निर्णय जाहीर केला. ते सुद्धा कोणतेही सत्तेचे पद स्वीकारणार नाहीत. काही महिन्यांपूर्वी सरन्यायाधीश गोगोई यांनी निवृत्त होताक्षणीच खासदारकी स्वीकारली होती. तुम्ही सत्तेला अनुकूल रहा. ती सत्ता तुम्हाला आयुष्यभर साथ देईल. असा गोगोई साहेबांना विश्वास असावा. त्या मानाने यापूर्वीचे सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी कोणत्याही विषयावर स्पष्ट निकाल दिला नाही. पण चंद्रचूड यांनी तत्कालीन सरकारला जाचक होतील असे निर्णयही दिले नव्हते. धमक्या मात्र खूप दिल्या होत्या. उदाहरणार्थ उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला नसता. तर आम्ही त्यांना पुन्हा मुख्यमंत्री पदावर बसवले असते, असे चंद्रचूड म्हणाले. पण निकाल? देताना घोळात घोळ करून टाकला. त्यामानाने विचार केला तर, सरन्यायाधीश पदावरच्या न्यायमूर्तींनी कसा आदर्श ठेवावा. याचे उदाहरण खन्ना यांनी या सर्वांनाच घालून दिलेले आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरात अनेक पोत्यांमध्ये सापडलेल्या भरभरून नोटा सर्वांनी पाहिल्यावर अजूनही त्यांनी राजीनामा दिलेला नाही. त्याविरुद्ध महाभियोग चालवण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. अशा स्थितीत खन्ना साहेबांनी सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांनी आपली मालमत्ता जाहीर करावी. असे सांगून सर्वांकडून आपल्या मालमत्तेचा तपशील जाहीर करून घेतला हे विशेष आहे. भारताच्या इतिहासात हे अत्यंत महत्त्वाचे असे अंगदाच्या पावलासारखे पाऊल आहे. आजकाल सत्ता आणि पैशांच्या मोहात भलेभले ढेपाळतात. पण आतापर्यंत असलेले सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि उद्यापासून होणारे सरन्यायाधीश गवई साहेब या दोघांनी रामशास्त्री बाण्याचा परिचय देऊन न्यायपालिकेची मान उंच केली आहे. पेशव्यांच्या काळातील पेशव्यांचे न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे यांनी आपला करारी आणि प्रामाणिक बाणा जपत पेशव्यांच्या विरुद्ध निर्णय देऊन आपला राजीनामा दिला होता. आताच्या काळात असा बाणेदारपणा दाखवणे भल्याभल्यांना जमत नाही. आज अशी बिकट स्थिती आहे की, सामान्याला न्याय मिळणे कठीण झालेले आहे. अहो सामान्य कशाला, असामान्यालाही न्याय मिळणे कठीण झालेले आहे. त्यांनाही वेळेवर न्याय मिळत नाही. ही कटू असली तरी सत्य परिस्थिती आहे. त्यामुळेच असे म्हणतात की, भल्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये. पण कोर्टाची पायरी चढल्याशिवाय कधी कधी पर्यायही नसतो आणि कोर्टात गेल्यावरही कोणता वकील किती प्रभावी आहे. यावरही अनेक निकाल अवलंबून असतात. अनेक वेळा न्यायदानाच्या खुर्चीवर बसल्यावर जो निस्पृहपणा लागतो. तो भल्या भल्या धुरिणांनाही साधत नसतो. उद्या होणारे सरन्यायाधीश गवई हे अत्यंत पारदर्शक निकालासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांच्या पारदर्शकपणाचा एक किस्सा खूप महत्त्वाचा आहे. राहुल गांधी यांच्या खटल्यामध्ये राहुल गांधी यांची खासदारकी गेल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात तो खटला दाखल झाला होता. तो खटला गवई साहेब यांच्या समोर सुरू होता. त्यावेळी याच गवई साहेबांनी प्रतिपक्षाच्या वकिलांना अगदी सुस्पष्टपणे सांगितले की, आपले कुटुंब काँग्रेस पक्षाशी प्रेम ठेवून होते. त्यामुळे आपल्याला आमच्या खंडपीठांसमोर खटला चालवायचा नसेल. तर आपण दुसऱ्या खंडपीठांसमोर जाऊ शकता. असे स्पष्टपणे सांगून पर्याय देणारे खरोखरच किती लोक असतात. मात्र तेव्हाच्या वकिलांनीही गवई यांच्यावर आपला पूर्ण विश्वास आहे. असे सांगितल्यावर सुनावणी झाली होती. अशा स्पष्टवक्त्या आदर्शवादी विचारांच्या सरन्यायाधीशाची आपल्याला नितांत गरज आहे. असे स्पष्ट बोलणारे आणि पारदर्शी सरन्यायाधीश आपल्याला मिळत आहेत. हे आपल्या न्यायपालिकेसाठी आणि जनतेसाठी चांगले लक्षण आहे. संजीव खन्ना साहेबांना निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी शुभेच्छा आणि गवई साहेबांचे या नियुक्तीबद्दल मनापासून अभिनंदन!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# शोपियांमध्ये ३ अतिरेकी ठार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :
मंगळवारी जम्मू-काश्मीरमधील शोपियान येथे झालेल्या चकमकीत लश्कर ए तैयबाचे ३ दहशतवादी मारले गेले. हे एन्काउंटर सायंकाळपर्यंत सुरू होते.
सोमवारी रात्री जम्मू-काश्मीर, पंजाब आणि राजस्थानमध्ये ड्रोन दिसले. काही वेळाने सैन्याने सांगितले की, शत्रूच्या कोणत्याही ड्रोनबद्दल कोणतीही माहिती नाही. आज सर्व ठिकाणी परिस्थिती सामान्य आहे.

७ मे रोजी ऑपरेशन सिंदूर सुरू झाल्यापासून पाकिस्तानी गोळीबारात आर्मीचे ६ आणि २ बीएसएफ जवान शहीद झाले आहेत आणि ५९ जण जखमी झाले आहेत. याशिवाय २८ नागरिकांनाही आपला जीव गमवावा लागला आहे.

युद्धविरामानंतर, मंगळवारी सीमावर्ती जिल्हे वगळता काश्मीरसह संपूर्ण केंद्रशासित प्रदेशातील सर्व शाळा आणि महाविद्यालये पुन्हा सुरू झाली. त्याच वेळी, १४ मे पासून काश्मीर विद्यापीठात वर्ग सुरू होतील. अधिका?यांनी सांगितले की, कुपवाडा आणि बारामुल्ला जिल्ह्यांव्यतिरिक्त, बांदीपोराच्या गुरेझ सेक्टरमध्ये शाळा बंद राहतील.

## ड्रोन हल्ल्यात महिलेचा मृत्यू

भारत-पाकिस्तान तणावादरम्यान ९ मे रोजी फिरोजपूरच्या खाई फेम गावात झालेल्या ड्रोन हल्ल्यात जखमी झालेल्या सुखविंदर कौर या महिलेचा लुधियानाच्या डीएमसी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर, त्याच अपघातात जखमी झालेले तिचे पती लखविंदर सिंग आणि मुलगा अजूनही उपचार घेत आहेत. सरकारने कुटुंबाला ५ लाख रुपये देण्याची घोषणा केली आहे. हे तेच कुटुंब आहे ज्यांनी फिरोजपूरच्या खाजगी अनिल बागी रुग्णालयावर युद्धासारख्या परिस्थितीतही उपचारांसाठी आगाऊ पैसे मागितल्याचा आरोप केला होता. कुटुंबाचा आरोप आहे की रुग्णालयाने ४०,००० रुपये जमा केल्यानंतरच उपचार सुरू केले.



दुसरीकडे, युद्धबंदीच्या घोषणेनंतरही, सोमवारी रात्री सलग तिसऱ्या दिवशी पंजाबमध्ये ड्रोन दिसले. तथापि, लष्कराच्या पथकाने त्यांना हवेतच हाणून पाडले. यानंतर, होशियारपूरच्या दसुहा आणि मुकेरियानमध्ये ब्लॅकआउट लागू करण्यात आला. दोन्ही ठिकाणी ५ ते ७ स्फोटांचे आवाज ऐकू आले.
याशिवाय, जालंधरमधील मांड येथे एक ड्रोन पाडण्यात आला. प्रशासनाने सुरानुसीमध्ये ब्लॅकआउट लागू केले. येथेही स्फोटांचे आवाज ऐकू आले.

रात्री अमृतसरमध्ये काही काळ वीजपुरवठा खंडित झाला. तसेच, दिल्लीहून येणाऱ्या विमानाला येथे उतरण्याची परवानगी देण्यात आली नाही आणि मानसा येथूनच परत आणण्यात आले. इंडिगो आणि एअर इंडियाने आज चंदीगड आणि अमृतसरला जाणारी आणि येणारी उड्डाणे रद्द केली आहेत.



## मोदींकडून सैनिकांचे अभिनंदन

■ वृत्तसंस्था, जालंधर, दि. १३ :
भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी सकाळी अचानक पंजाबमधील जालंधर येथील आदमपूर एअरबेसवर पोहोचले. येथे त्यांनी हवाई दलाच्या अधिकाऱ्यांची आणि सैनिकांची भेट घेतली. त्यांनी ऑपरेशनबद्दल चर्चा केली. यशस्वी हवाई हल्ल्याबद्दल त्यांनी सैनिकांचे अभिनंदनही केले.

सैनिकांना भेटल्यानंतर पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियावर लिहिले की, आज सकाळी मी आदमपूर येथील हवाई दलाच्या तळाला भेट दिली आणि आपल्या शूर हवाई योद्ध्यांना आणि सैनिकांना भेटलो. धैर्य, दृढनिश्चय आणि निर्भयतेचे प्रतीक असलेल्या लोकांसोबत राहणे हा एक अतिशय खास अनुभव होता. आपल्या देशासाठी सर्व काही करणाऱ्या आपल्या सशस्त्र दलांचा भारत नेहमीच आभारी आहे.

पंतप्रधान मोदी आदमपूर एअरबेसवर सुमारे एक तास राहिले. पाकिस्तानने दावा केला होता की त्यांच्या सैन्याने केलेल्या हल्ल्यात आदमपूर एअरबेसचे नुकसान झाले आहे.

मोदी म्हणाले, 'भारतात निष्पाप लोकांचे रक्त सांडल्याने एकच परिणाम होईल विनाश आणि सामूहिक विनाश.' ज्या पाकिस्तानी सैन्यावर हे दहशतवादी अवलंबून होते, त्यांना भारतीय लष्कर, हवाई दल आणि नौदलाने पराभूत केले आहे.

'पाकिस्तानात अशी कोणतीही जागा नाही जिथे दहशतवादी बसून शांततेत श्वास घेऊ शकतील.' आम्ही घरात घुसून तुमच्यावर हल्ला करू आणि तुम्हाला पळून जाण्याची एकही संधी देणार नाही. आपल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा विचार करून पाकिस्तान बरेच दिवस झोपू शकणार नाही.

'पाकिस्तानच्या विनंतीनंतर भारताने आपली लष्करी कारवाई पुढे ढकलली आहे. जर पाकिस्तानने पुन्हा दहशतवादी कारवाया किंवा लष्करी धाडस केले तर आम्ही त्याला योग्य उत्तर देऊ. मी हे उत्तर माझ्या पद्धतीने देईन, असेही ते म्हणाले.

## कृत्रिम वाळू एम-सँड धोरणास मंजुरी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक झाली. यात अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.



राज्य सरकारच्या वतीने कृत्रिम वाळू एम-सँड धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे आता बांधकामाला लागणारी वाळू उपलब्ध होण्यास सुविधा होईल. तसेच राज्य वेतन त्रुटी निवारण समितीचा अहवालही राज्य सरकारच्या वतीने स्वीकारण्यात आला आहे. ८० कोटींचा भार राज्य सरकार स्वीकारणार आहे.


### मंत्रिमंडळ निर्णय संक्षिप्त स्वरुपात

■ रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरते पथक योजनेस मान्यता. २९ महापालिका क्षेत्रात पहिल्या टप्प्यात ३१ मोबाईल व्हॅन, यासाठी सुमारे ८ कोटी मंजूर. (महिला व बालविकास विभाग)
■ नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पबाधितांना होम स्वीट होम अंतर्गत वाटप केलेल्या घरांच्या भाडेपट्ट्याच्या दस्तऐवजास मुद्रांक शुल्क कमी करुन केवळ एक हजार रुपये आकारणार. (महसूल विभाग )
■ कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरणास मंजुरी - प्रत्येक जिल्ह्यात ५० व्यक्ती/संस्थांना एम-सँड युनिट स्थापन करण्यासाठी उद्योगविभाग सवलती देणार, एम-सँड तयार करणाऱ्या युनिटला २०० रुपये प्रतिब्रास इतकी सवलत देणार. पर्यावरणाची हानी टळणार. (महसूल विभाग)
■ राज्य वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवाल स्वीकृत. ८० कोटींचा भार राज्य सरकार स्वीकारणार. (वित्त विभाग)
■ राज्यातील शासकीय आयटीआयचे सार्वजनिक-खाजगी भागिदारीतून अद्ययावतीकरण धोरण - आयटीआयला जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रात रुपांतरित करणे हा मुख्य हेतू, उद्योग आणि आयटीआयच्या समन्वयातून रोजगारक्षमता वाढणार, प्रॅक्टिकल लर्निंग आणि अप्लाईड लर्निंगचे उद्देश साध्य होणार. (कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग)
■ राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या महाराष्ट्रातील उपकेंद्रासाठी चिंचोली (ता. कामठी) जिल्हा नागपूर येथील २०.३३ हेक्टर आर जागा देण्याचा निर्णय (महसूल विभाग)

आज दुपारी बारा वाजता ही बैठक झाली. राज्यात रखडलेली अनेक कामे तसेच शेतकऱ्यांच्या पीक परिस्थितीचा आढावा देखील आजच्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

## न्यायमूर्ती भूषण गवई आज घेणार सरन्यायाधीश पदाची शपथ

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :
न्यायमूर्ती भूषण गवई हे सर्वोच्च न्यायालयाचे ५२ वे सरन्यायाधीश बनणार आहेत. १४ मे रोजी भूषण गवई यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू शपथ देतील. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी विराजमान होणारे न्यायमूर्ती भूषण गवई हे सहावे मराठी व्यक्ती ठरतील.



न्यायमूर्ती भूषण गवई यांचा जन्म अमरावतीमध्ये झाला. केरळ व बिहारचे माजी राज्यपाल तसेच रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते रा. सू. गवई यांचे ते सुपूत्र आहेत. १४ वर्षे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राहिल्यानंतर त्यांना सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती म्हणून बढती मिळाली.

## दहावीच्या निकालातही मुलींचीच बाजी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने इयत्ता दहावीचा निकाल आज ऑनलाईन जाहीर केला. बारावी बोर्डाचा निकाल गत आठवड्यातच जाहीर झाला होता.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत २१ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान घेण्यात आलेल्या माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर झाला. यंदा राज्यात दहावी परीक्षा निकाल ९४.१० टक्के लागला.



२०२४ च्या तुलनेत फेब्रुवारी-मार्च २०२५ चा निकाल १.७१ टक्केने कमी आहे. परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपद्धतीनुसार दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात आला.

(अधिक वृत्त पान २ वर)

## निवडणूक बॅलेट पेपर वरच व्हावी

### मातोश्री कमला गवई यांचा ईव्हीएमवर संशय

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :
देशाचे नवे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती बी आर गवई आज पद व गोपनीयतेची शपथ घेणार आहेत. तत्पूर्वी, त्यांच्या मातोश्री कमला गवई यांनी पत्रकारांशी संवाद साधताना ईव्हीएमपेक्षा बॅलेट पेपरवर निवडणूक घेणे केव्हाही चांगले असे मत व्यक्त केले आहे. त्यांच्या या विधानावर उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.



देशातील काँग्रेससह सर्वच विरोधी पक्ष देशात मतपत्रिकेवर अर्थात बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी करत आहेत. त्यातच अमेरिकन गुप्तहेर संघटनेने ईव्हीएम हॅक होऊ शकते असे निरीक्षण नोंदवल्याने भारतातील निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

या पार्श्वभूमीवर पत्रकारांनी न्यायमूर्ती बी आर गवई यांच्या मातोश्री कमला गवई यांना ईव्हीएमच्या मुद्यावर नव्या सरन्यायाधीशांनी एखादा निर्णय घेतला पाहिजे का? असा प्रश्न केला होता. त्यावर बोलताना कमला गवई यांनी वरील प्रमाणे आपले प्रांजळ मत व्यक्त केले.

## सीबीएसईच्या निकालातही मुलीच अव्वल



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :
सीबीएसई म्हणजेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावीचा निकाल जाहीर केला आहे. दहावीच्या परीक्षा १५ फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान झाल्या. यावर्षी सुमारे ४४ लाख विद्यार्थ्यांनी बोर्डाची परीक्षा दिली होती.

अधिकृत वेबसाइट व्यतिरिक्त, विद्यार्थ्यांना डिजिलॉकर आणि उमंग ॲपवरही त्यांची गुणपत्रिका मिळू शकेल. यासाठी देखील तुम्हाला रोल नंबरच्या मदतीने ॲपवर लॉग इन करावे लागेल. तुम्ही तुमच्या मोबाईलवर मार्कशीट डाउनलोड करू शकाल.

**गुणवत्ता यादी जाहीर होणार नाही**

सीबीएसई बोर्ड गुणवत्ता यादी जाहीर करत नाही. याशिवाय, निकालात कोणताही टॉपर घोषित केलेला नाही. मंडळाने सर्व शाळा आणि शैक्षणिक संस्थांना कोणत्याही मुलाला शाळा किंवा जिल्ह्यातील टॉपर म्हणून घोषित करू नये असे निर्देश दिले आहेत.

निकाल जाहीर झाल्यानंतर, विद्यार्थी त्यांच्या गुणपत्रिका ऑनलाइन तपासू शकतात परंतु हे केवळ तात्पुरते आहे. विद्यार्थ्यांना त्यांची मूळ गुणपत्रिका त्यांच्या शाळेतून घ्यावी लागेल. पुढील अभ्यासासाठी आणि इतर अधिकृत कामांसाठी मूळ गुणपत्रिका आवश्यक आहे. शाळा सहसा विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रिकेबद्दल अपडेट देतात. २०२४ मध्ये, सीबीएसई बोर्डाचा दहावीचा निकाल १३ मे रोजी जाहीर झाला होता.

## मुख्यमंत्र्यांसोबत होणारी ओबीसी संघटनांची बैठक तडकाफडकी रद्द

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतल्याने ओबीसी संघटनांची प्रमुख मागणी मान्य झाली आहे.
त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करावे म्हणून विदर्भातील एका आमदारांच्या पुढाकाराने ओबीसी संघटनांची मुख्यमंत्र्यांसोबत एक बैठक मंगळवारी मुंबईत आयोजित करण्यात आली होती.
मात्र ती तडकाफडकी रद्द केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. कौटुंबिक कलहामुळे वादग्रस्त ठरलेल्या आमदारामुळे ही बैठक रद्द करण्यात आल्याची चर्चा आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेत ओबीसींचे २७ टक्के आरक्षण कायम राहावे, जात निहाय जनगणना करावी या प्रमुख मागण्यांसह इतरही मागण्या ओबीसी संघटनांच्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाने २०१७ प्रमाणेच ओबीसी आरक्षणाच्या आधारावर निवडणुका घेण्याचे आदेश राज्य शासन व निवडणूक आयोगाला दिले आहे.

एक प्रकारे ओबीसी संघटनाच्या दोन्ही प्रमुख मागण्यावर सध्या तोडगा निघाला. यासाठी राज्य शासनातर्फे पाठपुरावा करणारे फडणवीस यांचा ओबीसी संघटनांच्यावतीने सत्कार करण्याचे ठरले. त्यासाठी विदर्भातील सताधारी पक्षाच्या एका आमदाराने पुढाकार घेतला. त्याअनुषंगाने मंगळवारी मुंबईत ओबीसी संघटनांचे प्रतिनिधी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत ऐक बैठक होणार होती. त्याचे निमंत्रण ओबीसी संघटनांच्या नेत्यांना देण्यात आले होते.
काही संघटनेचे नेते मुंबईडे रवानाही झाले होते. याच दरम्यान बैठक रद्द झाल्याची निरोप सर्वसंबंधितांना देण्यात आला. ज्या आमदाराने बैठकीसाठी पुढाकार घेतला होता ते सध्या कौटुंबिक कलहामुळे वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. या कारणामुळे मुख्यमंत्र्यांनी ही बैठक रद्द केल्याचीही चर्चा आहे.

## आंतरराज्यीय सायबर गुन्हेगारांच्या टोळीचा पर्दाफाश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
शेअर ट्रेडिंगमध्ये भरघोस नफ्याचे आमिष दाखवून लोकांची फसवणूक करणाऱ्या एका मोठ्या आंतरराज्यीय सायबर गुन्हेगारांच्या टोळीचा सायबर पोलिसांनी भंडाफोड केला.

या टोळीने इंदूरमध्ये बनावट कॉल सेंटर उभारून देशभरातील नागरिकांना गंडा घातल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणात सायबर पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून सुमारे 14.55 लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सुनील प्रतापसिंग राजपूत (28) रा. छत्रीबाग, इंदूर, अभिषेक चंद्रकांत गुप्ता (35) रा. नंदानगर, इंदूर आणि बंटी उर्फ विहान कमलचंद सोळंकी (30) रा. उमरीखेडा, इंदूर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. ही कारवाई नागपूर सायबर पोलिसांनी राजेश सुकराम डोंगरे (55) यांच्या तक्रारीवरून केली. त्यांनी 27 नोव्हेंबर 2024 रोजी तक्रार दाखल केली होती.

अभिषेक आणि रिया नावाच्या आरोपींनी राजेश यांच्याशी संपर्क साधला. अल्गो ट्रेडिंगच्या माध्यमातून मोठा नफा मिळेल, असे सांगत त्यांनी सुरुवातीला 1 लाख रुपये गुंतवायला लावले. त्यानंतर ईमेलद्वारे सेबी (एसईबीआय)चे बनावट रजिस्ट्रेशन आणि अन्य कागदपत्रे पाठवली. 12 ट्रेडनंतर 24.75 टक्के कमिशन मिळेल, असे सांगत

### नागपूर सायबर पोलिसांचा इंदूरमध्ये छापा

राजेशकडून विविध खात्यांमध्ये 12.43 लाख रुपये ट्रान्सफर करून घेतले. ईमेलच्या माध्यमातून त्यांना नफ्याची माहिती दिली जात होती. राजेश यांनी आपली गुंतवलेली रक्कम परत मागितली असता आरोपींनी एकूण रकमेवर 9.63 टक्के जीएसटीचे 4.83 लाख रुपये जमा करण्यास सांगितले.

राजेश यांनी आरोपींनी सांगितल्यानुसार ही रक्कमही शुभम सेंगर नावाच्या व्यक्तीच्या खात्यात जमा केली. त्यानंतर वेगवेगळे कारण सांगून आरोपींनी राजेश यांच्याकडून 63 लाख रुपये उकळले.

**आरोपींची खाती गोठवली**

सायबर पोलिसांनी त्यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत तपास सुरू केला. आरोपींची बँक खाती गोठवण्यात आली. आरोपींच्या मोबाईल नंबरचा सीडीआर काढला असता सर्व कॉल इंदूर येथून करण्यात आले होते. पोलिस उपायुक्त लोहित मतानी यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक बळीराम सुतार, सपोनि कविकांत चौधरी, पोहवा शैलेष, प्रफुल, योगेश आणि रोहित यांच्या पथकाने इंदूर येथील आरोपींच्या अड्ड्यावर धाड टाकली.

तेथे लोकांची फसवणूक करण्यासाठी बनावट कॉल सेंटरच उभारण्यात आले होते. टेलिकॉलर म्हणून आरोपींनी 25 जणांना कामावर ठेवले होते. सुनील आणि अभिषेकला अटक करून नागपुरात आणल्यानंतर तिसरा आरोपी विहान यालाही अटक केली.

**२०० हून अधिक लोकांची फसवणूक**

आरोपींनी अशाप्रकारे 200 हून अधिक लोकांची फसवणूक केली आहे. केवळ नागपूरच नाहीतर देशभरातील वेगवेगळ्या शहरातील लोकांची फसवणूक केली. न्यायालयाने आरोपींना पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## पाकिस्तान आता आतंकीस्तान



■ **मुंबई**: शिवसेना ठाकरे गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी पाकिस्तानकडून केल्या गेलेल्या शस्त्रसंधीच्या उल्लंघनावर सडकून टीका केली आहे. पाकिस्तान आता पाकिस्तान राहिले नसून आतंकीस्तान झाले आहे, अशी टीका प्रियंका चतुर्वेदी यांनी केली आहे. पाकिस्तान शस्त्रसंधीचे वारंवार उल्लंघन करत आहे, त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय सैन्य बिलकुल तयार आहे. तसेच भारतीय सैन्याने केलेल्या हल्ल्यात सामान्य नागरिकांना कुठलीही इजा पोहोचवली जात नसल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे.

प्रियंका चतुर्वेदी पुढे म्हणाल्या, पाकिस्तानकडून आपल्या इथल्या सामान्य नागरिकांवर हल्ले होत आहेत. त्या देशांनी हे पाहायला पाहिजे, ज्यांनी आयएमएफला कर्ज दिले आहे, जे देश म्हणतात की आम्ही त्यांच्यासोबत व्यापार करणार, त्यांनी बघायला पाहिजे की पाकिस्तान एक धूर्त देश आहे. पाकिस्तान आता पाकिस्तान कमी आणि आतंकीस्तान बनला आहे, अशी टीका त्यांनी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे म्हटले की पाकिस्तानसोबत जर काही बोलणी झाली तर त्यात केवळ पीओकेवरच बोलणे होईल. तसेच पाकिस्तान जोपर्यंत दहशतवादी कारवाया करणे बंद करत नाही तोपर्यंत त्यांच्यासोबत कोणतेही बोलणे केले जाणार नाही, असे मोदींनी स्पष्ट केले आहे. भारतीय जनतेची सुद्धा तीच भावना आहे, असेही त्या म्हणाल्या.

## काश्मीर भारताचा अविभाज्य भाग



■ **मुंबई** : शिवसेना आमदार आदित्य ठाकरे यांनी काश्मीर आणि पाकिस्तान अधिकृत काश्मीर बाबत केंद्र सरकारला स्पष्ट संदेश देताना सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

काश्मीर भारताचा अविभाज्य भाग आहे आणि यापुढेही राहील. काश्मीर हा आंतरराष्ट्रीय किंवा द्विपक्षीय मुद्दा नाही. फक्त पीओके हा द्विपक्षीय मुद्दा आहे, कारण तो भारताचा भाग असून पाकिस्तानने बेकायदा ताब्यात घेतला आहे. तो भारताला परत मिळालाच पाहिजे, असे ठाकरे यांनी पोस्ट केले.

आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारला आवाहन केले की, जगासमोर काश्मीरच्या मुद्द्यावर भारताची भूमिका स्पष्ट करावी. काश्मीरवर कोणतीही चर्चा होऊ शकत नाही. पीओकेची परतफेड हाच एकमेव चर्चेचा विषय असू शकतो, असे त्यांनी नमूद केले. या पोस्टद्वारे ठाकरे यांनी केंद्र सरकारला पीओके परत आणण्यासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी केली आहे.

## मोठा शो नाही, देशधर्माचा प्रश्न



■ **मुंबई** : आपण पुन्हा एकदा पहलगाम व्हावा, माता-भगिनींचं कुंकू पुसलं जावं, याची वाट पाहता का? अशा तीव्र शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी भाजप आमदार अतुल भातखळकर यांच्या ऑपरेशन सिंदूर सीझन २च्या बयानावर जोरदार टीका केली आहे.

भातखळकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ऑपरेशन सिंदूर कारवाईवर सीझन १ पूर्ण, सीझन २ची प्रतीक्षा अशी वक्तव्ये केली होती. त्यावर आत्मियता न दाखवत खडसे म्हणाल्या, हे सगळं बिग बॉस किंवा खतरों के खिलाड़ी सारखं मनोरंजन नाही, तर देशाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. या शब्दावलीमुळे मातोश्रींचा सन्मान ठेस पोहचतो. खडसेंनी पुढे म्हटलं, आपल्या नेतृत्वाचं कौतुक करावं, पण त्याला मर्यादा असाव्यात. देशाच्या सुरक्षिततेशी खेळी करता येणार नाही. अशा वक्त्यांना राजकारणात जागा नाही.

## जीएसटीच्या गोपनीय माहितीवर डल्ला



■ **मुंबई** : जीएसटी नोंदणीसाठी सादर करण्यात आलेल्या गोपनीय माहितीवर बँकांकडून बेकायदेशीर हस्तक्षेप सुरू असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. करदात्यांच्या नोंदणी प्रमाणपत्रानंतर त्यांना सतत बँकांकडून फोन करून खातं उघडण्याची गळ घालण्याचे प्रकार वाढले आहेत. या संदर्भात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री अजित पवार यांना पत्र लिहून उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशीची मागणी केली आहे.

दानवे यांनी आपल्या पत्रात स्पष्टपणे म्हटले आहे की, जीएसटी विभागातील काही कर्मचारी आणि अधिकारीच करदात्यांची संवेदनशील माहिती तृतीय पक्षांपर्यंत पोहचवत असल्याचा गंभीर आरोप झाला आहे. त्यांनी म्हटले की, करदात्यांची माहिती ही अत्यंत गोपनीय असून कोणत्याही परिस्थितीत ती बाहेर गळती होणे म्हणजे कायद्याचे उल्लंघन आहे. यामुळे शासन व कर प्रशासनाबाबत करदात्यांमध्ये अविश्वास निर्माण होत आहे.

या प्रकरणात बँकांची भूमिका संशयास्पद असल्याचे अधोरेखित करत दानवे यांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. यासोबतच, भविष्यात असे प्रकार पुन्हा घडू नयेत, यासाठी जीएसटी विभागात कठोर खबरदारी व निगराणी यंत्रणा उभारण्याचाही आग्रह त्यांनी केला आहे. विशेष म्हणजे, जीएसटी कायद्यानुसार करदात्यांची माहिती गोपनीय ठेवण्याची सक्त अट असून त्याचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो. मात्र तरीही यंत्रणेतील काही गटांकडून ही माहिती थेट बँकांकडे जात असल्याचे चित्र समोर आल्याने राज्यात मोठा खळबळ उडाली आहे.

# राज्यात बेफाम पावसाचे ५ बळी

## मराठवाडा, खानदेशसह विदर्भालाही फटका



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३** :
बेफाम पावसाने नाशिक, जळगाव, बुलडाणा, अहिल्यानगरसह धाराशिव जिल्ह्यातील काही भागांत दाणादाण उडवून दिली. विजेच्या कडकडाटासह तासभर कोसळलेल्या पावसाने ५ जणांचा बळी घेतला. कांद्यासह फळपिकांचेही मोठे नुकसान झाले. १७ मेपर्यंत राज्यात कमीअधिक प्रमाणात पाऊस राहील, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

एकीकडे तुफानी वाऱ्यासह होत असलेल्या पावसाने ५ जणांचे बळी घेतले असताना दुसरीकडे उन्हाच्या तडाख्याने हैराण झालेल्यांना दिलासा दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून ४५ अंशावर पोहोचलेल्या अकोला शहराचे तापमान ४० अंश सेल्सियसवर पोहोचले. अशीच स्थिती कमी अधिक फरकाने इतर शहरांची होती.

जालना जिल्ह्याच्या भाटेपुरी येथे वीज पडून विठ्ठल कावळे (२४) हा तरूण ठार झाला. धाराशिव जिल्ह्यात भूम शहरासह ग्रामीण भागात विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस बरसला. वादळी वाऱ्यामुळे शेकडो वृक्ष उन्मळून पडले. घरांवरील पत्रे उडाले. शेतीतील पिकांचेही मोठे नुकसान झाले.

संभाजीनगर जिल्ह्यात खुलताबाद, कन्नड, फुलंब्री, वैजापूर या भागात वादळी पाऊस झाला. तर जालन्यात भोकरदन व अंबडला पावसाने हजेरी लावली. अंबड तालुक्यातील हसनापूर येथे भिंत कोसळली. बीड शहरातील पोलिस पेट्रोल पंपाचे छत कोसळून दोघे जखमी झाले. तर पोलिस वसाहतीच्या इमारतीत वादळामुळे नव्या घरांचे दरवाजे तुटले, खिडक्या फुटल्या, संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले. यात एक मुलगी जखमी झाली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील चांदा येथे वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. मिरी रोडवरील श्रीरेणुकामाता देवी मंदिराच्या कळसावर वीज कोसळली. त्यामुळे कळसाचा घुमट तुटून मोठे नुकसान झाल्याची माहिती देवीचे पुजारी भाऊसाहेब भगत यांनी दिली.

करमाडच्या आठवडी बाजारात चांगलीच गर्दी होती. अचानक वादळी वारा सुरू झाल्याने व्यापाऱ्यांनी सावलीसाठी लावलेल्या ताडपत्र्या उडाल्या. त्यात गारांचा पाऊस सुरू झाल्याने एकच धांदल उडाली.

सिल्लोडला दुपारी चारनंतर वादळी वाऱ्यासह तासभर पाऊस झाला. ठिकठिकाणी रस्त्यांवर पाणी साचले होते. तर फुलंब्री तालुक्यातील आळंद येथे वादळी पावसाने घरांवरील पत्रे उडून रस्त्यावर पाणी साचले होते.

नाशिक येथे सातपूर ईएसआय मैदानाजवळील क्लब हाऊसबाहेर गुलमोहराचे झाड दुचाकीवर कोसळून गौरव रिपोर्टे (२१), सम्यक भोसले (१९) मरण पावले. इगतपुरी, उंबरकोन येथील येथे २४ वर्षीय पूजा भांगरे वीज कोसळून ठार झाली.

विदर्भाच्या बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील वीरपांग्रा येथील रंजना चव्हाण (३५) पावसापासून वाचण्यासाठी शेतातील लिंबाच्या झाडाखाली उभ्या होत्या. नेमक्या याच झाडावर वीज कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार बुधवारी विदभार्तील काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट आहे. याशिवाय राज्याच्या अन्य भागात यलो अलर्ट आहे. या वेळी वेगाने वारे वाहणार आहेत. १७ मेपर्यंत राज्यात कमी-जास्त पाऊस राहील. काही भागात जोरदार पाऊस होईल.

# यावर्षी ९४.१०% विद्यार्थी उत्तीर्ण

## दहावी बोर्डाचा निकाल जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३** :
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने इयत्ता दहावीचा निकाल आज ऑनलाईन जाहीर केला. हा निकाल विद्यार्थ्यांना बोडार्ने निश्चित केलेल्या अधिकृत संकेतस्थळावर हा निकाल पाहता येईल. बारावी बोडार्चा निकाल गत आठवड्यातच जाहीर झाला होता.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत 21 फेब्रुवारी- 17 मार्च 2025 दरम्यान घेण्यात आलेल्या माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर झाला. यंदा राज्यात दहावी परीक्षा निकाल 94.10 टक्के लागला आहे.

फेब्रुवारी-मार्च 2024 च्या तुलनेत फेब्रुवारी-मार्च 2025 चा निकाल 1.71 टक्केने कमी आहे. परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपद्धतीनुसार दुपारी 1 वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात आल्याची माहिती राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी मंडळाचे सचिव देविदास कुलाळ ,सहसचिव मेधा निरफारके, सहाय्यक सचिव सीमा रांगडे,लेखाधिकारी शैलेंद्र पाटील, गणतंत्र व्यवस्थापक हेमंत राजपूत उपस्थित होते.

गोसावी म्हणाले की, या परीक्षेस राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण 15,58,020 नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी 15,46,579 विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यापैकी 14,55,433 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी 94.10 आहे.

या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळामधून एकूण 28,512 खाजगी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी 28,020 विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यापैकी 22,518 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी 80.36 आहे.

या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळामधून एकूण 24,376 पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी 23,954 विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यापैकी 9,448 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी 39.44 आहे.

### ८८४४ दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्ण

या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळामधून नियमित, खासगी व पुनर्परिक्षार्थी मिळून एकूण 16,10,908 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी 15,98,553 विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यापैकी 14,87,399 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी 93.04 आहे.

या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळामधून एकूण 9,673 दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी 9,585 दिव्यांग विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यापैकी 8,844 दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी 92.27 आहे.

### निकालाची वैशिष्ट्ये

■ सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थ्यांचा कोकण विभागाचा निकाल (98.82 %) सर्वाधिक असून सर्वात कमी निकाल नागपूर विभागाचा (90.78%) आहे.

■ सर्व विभागीय मंडळातून नियमित मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी 96.14 असून मुलांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी 92.31 आहे. म्हणजेच मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा 3.83 ने जास्त आहे.

■ माध्यमिक शालान्त (इ.10 वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च 2025 करीता एकूण 62 विषयांची परीक्षा घेण्यात आली. त्यापैकी एकूण 24 विषयांचा निकाल 100% टक्के लागला आहे.

■ राज्यातून नियमित उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी 4,88,745 विद्यार्थी प्राविण्यासह प्रथम श्रेणीत, 4,97,277 विद्यार्थी प्रथम श्रेणीत, 3,60,630 विद्यार्थी द्वितीय श्रेणीत, 1,08,781 विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

■ राज्यातील 23,489 माध्यमिक शाळांतून 15,58,020 नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी 7,924 शाळांचा निकाल 100% लागला आहे.

### पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज कसा करावा?

मंडळाने विद्यार्थ्यांना गुणपडताळणी व छायाप्रतीसाठी बुधवार दिनांक 14 मे ते 28 मे पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचीही मुभा उपलब्ध करून दिली आहे. पण त्यासाठी त्यांना योग्य ते शुल्क भरण्याची सूचना केली आहे.

फेब्रुवारी-मार्च 2025परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाइन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून, छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करून संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे, शुल्क भरणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा, असे माध्यमिक परीक्षा मंडळाच्यावतिने कळविण्यात आले आहे.

## तेजस्वी घोसाळकर यांचा राजीनामा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३** :
शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मुंबईतील दहिसर विधानसभा



मतदारसंघात मोठा धक्का बसला आहे. माजी नगरसेविका आणि महिला दहिसर विधानसभा प्रमुख तेजस्वी घोसाळकर यांनी पक्षातील स्थानिक नेतृत्वाविरोधातील नाराजीमुळे आपल्या पदाचा आणि पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. घोसाळकर यांनी विभागप्रमुख उदेश पाटेकर आणि महिला विभाग संघटक शुभदा शिंदे यांना वैयक्तिक कारणांचा हवाला देत राजीनामा सादर केला. मात्र, स्थानिक नेत्यांच्या मनमानी कारभाराविरोधात त्यांनी वारंवार व्यक्त केलेल्या नाराजीला पक्षाकडून प्रतिसाद न मिळाल्याने हा निर्णय घेतल्याचे सूत्रांनी सांगितले.

तेजस्वी घोसाळकर यांनी राजीनाम्यात पक्षप्रमुख आणि कार्यपद्धतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, पण स्थानिक गटबाजीमुळे त्या नाराज होत्या. दहिसर हा ठाकरे गटाचा बालेकिल्ला मानला जातो.

## शाहरुख खानच्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला ६२ लाख भरपाई

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३** :
पूर्ण भरपाई मिळणे कठीण असले तरी योग्य भरपाई हा नियम असला पाहिजे, असे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाने अभिनेता शाहरुख खानच्या प्रॉडक्शन हाऊसच्या एका कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला विमा कंपनीने दिलेली ६२ लाख रुपयांची भरपाई कायम ठेवली आहे. या कर्मचाऱ्याला हिट-अँड-रनमध्ये दुखापत झाली होती आणि नंतर त्याचा मृत्यू झाला.



न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने सांगितले की, त्यांना २०२० च्या नोव्हेंबरमध्ये लवादाने दिलेला आदेश रद्द करण्यास नकार दिला. मोटार वाहन कायदा हा लाभदायक कायदा आहे आणि अनुच्छेद २१ अंतर्गत नागरिकाला मिळालेला मूलभूत अधिकार, ज्यात सन्मानाने निरोगी जीवन जगण्याचा अधिकार समाविष्ट आहे, तो न्यायालय दुर्लक्षित करू शकत नाही. खानच्या रावण या चित्रपटासाठी व्हीएफएक्सवर काम करणाऱ्या खांडल यांचा मृत्यू झाला.

अपघातानंतर खांडल यांच्या कुटुंबीयांनी जून २०१४ मध्ये मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाकडे भरपाईसाठी दाखल केला होता. विमा कंपनीने महिलेचा मृत्यू आणि अपघातात झालेल्या दुखापतींमध्ये कोणताही संबंध नाही आणि तिचा मृत्यू अपघातानंतर चार वर्षांपेक्षा जास्त कालावधीनंतर झाल्याचे म्हटले होते.

## धगधगता लाव्हा..स्वराज्याचा छावा..

**जगदीश वाघ**

शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज म्हणजे अलौकिक बौद्धिक क्षमता, अचूक निर्णयक्षमता, धर्मकारण, अर्थकारण, राजकारण.. अशा विविध सर्वच बाबतीत प्रभूत्व असलेले जगातील एकमेव अद्वितीय छत्रपती होय. छत्रपती संभाजी महाराजांसोबत जगातील इतर राजे यांची तुलना तर सोडाच. त्यांच्या समोर जगातील कोणत्याही राजाचे नाव सुद्धा आपण लावू शकत नाही. एवढे संभाजी महाराजांचे कार्य हे गौरवशाली व स्फुर्तिदायी आहे. याचा आम्हांला अभिमान आहे.

संभाजी महाराज म्हणजे राजमाता जिजाऊ साहेब व शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या यांच्या शिकवणीतून तयार झालेले असे निडर, स्वाभिमानी, प्रखर देशाभिमान, संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक, संस्कृत, इंग्रजी, हिंदी, मराठी, ब्रज, अरबी, पोर्तुगीज, अशा जवळपास त्यावेळच्या सर्वच भाषां राजांना अवगत होत्या.

छत्रपती संभाजी महाराज म्हणजे एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात लेखणी घेऊन इतिहास घडविणारे आणि इतिहास लिहिणारे छत्रपती होते. छत्रपती संभाजी महाराज यांनी बुद्धभूषण, नखशिखां, नाइकाभेद, सातसतक हे ग्रंथ त्यावेळी लिहिले. जे आमच्यासारख्या इतिहास अभ्यासकांना आजही प्रेरणादायी आहेत. याचा आम्हांला खूप खूप अभिमान आहे.

काशीचे गागाभट्ट यांनी छत्रपती शिवपुत्र संभाजी महाराजांचे ज्ञान पाहून स्वतः ग्रंथ भेट दिला . त्याकाळी संभाजी महाराजांची बरोबरी करेल. असा एकही योद्धा जगाच्या पाठीवर नव्हता. नवे आजपर्यंत असा महापराक्रमी, महातेजस्वी राजा जन्माला आलाच नाही राजा म्हणजे फक्त युद्ध युद्ध करणे, हेच फक्त राजाचे काम, ही राजाची प्रतिमाच शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज यांनी बदलून टाकली. राजा म्हणजे एक प्रजापालक, आपले राज्य आदर्श कसे असावे, रयतेला स्वाभिमानी बनविणारे. आपल्या वडिलांनी दिलेला वारसा व या स्वराज्याच्या रक्षणासाठी जे जे मावळे धारातीर्थी पडले त्यांच्या कार्याची जाण असणे. या मातीच्या रक्षणासाठी आपण सुद्धा त्यांच्या कार्याचा अभिमान ठेवावा, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे छत्रपती संभाजी महाराज. वयाच्या १४ व्या वर्षी संस्कृत भाषेत त्यांनी बुधभूषण हा ग्रंथ लिहिला.

संभाजी महाराजांना एकाच वेळेस अनेक संकटांचा सामना करावा लागला. परंतु त्यांनी कोणतीही तडजोड कधीच केली नाही, कधी तह केला नाही, कधी माघार घेतली नाही. आपल्या आयुष्यात छत्रपती संभाजी महाराजांनी १२० लढाया केल्या. एकाही लढाईत त्यांनी कधी माघार घेतली नाही. कधी हार पत्करली नाही. एकच वेळेस चहूबाजूंनी संकटे आली असताना सुद्धा त्याला न घाबरता, न डगमगता आपल्या मावळ्यांनिशी त्यांनी या सर्वांवर मात केली.

ज्याप्रमाणे अभिमन्यूने चक्रव्यूहात सर्व बाजूंनी एकाचवेळी सर्वांशी लढा दिला, त्याच प्रमाणे संभाजी महाराजांनी एकाचवेळी चहूबाजूंनी संकटे आली परंतु आपल्या प्रखर अभिमान असलेल्या मावळ्यांच्या संगतीने त्यांनी त्यांचा बंदोबस्त केला व त्यांना जबर तडाखा दिला.

त्याकाळी छत्रपती संभाजी महाराजांशी दोन हात करेल असा एकही योध्दा जगाच्या पाठीवर नव्हता. नव्हे समोरुन वार करेल अशी हिंमतही कुणा मध्ये त्याकाळी नव्हती. कारण...

***घालुनी जबड्यात हात...***
***मोजती दात ही जात मराठ्यांची..***
***महाराष्ट्रात राहतो तो मराठा..***

महाराज हे खरोखरच छावा होते. आणि छाव्या समोर जाण्याची हिंमत कधीच कुण्या कोल्हे, लांडग्यांची होत नसते, मग त्यांची झुंड का असेना.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर हे स्वराज्य म्हणजे अगदी एका घासात गिळून टाकावे. असे त्या औरंगजेबाला वाटत होते. परंतु या छाव्याने असा काही जोरदार तडाखा दिला की त्या औरंगजेबाला स्वतः नऊ लाख फौज घेऊन महाराष्ट्रावर यावे लागले.

नऊ ते दहा वर्ष या छाव्याने औरंगजेबाला असे काही नामोहरण करून टाकले की औरंगजेब म्हणाला.... शिवा का बेटा संभा तो शिवा से भी ज्यादा खतरनाक है. ९ साल का था. तब देखा था हमने उसे वही तेज दिमाख. वही जोश.....

औरंगजेबाने अतिशय उदास होऊन जोपर्यंत संभाला पकडत नाही तोपर्यंत डोक्यावर टोपी घालणार नाही, अशी प्रतिज्ञा केली. त्याला कळून चुकले कि संभाजी महाराजांच्या सोबत युद्धामध्ये आपण जिंकू शकत नाही =. त्यासाठी काहीतरी गंभीर चाल केली पाहिजे. हे त्याला कळून चुकले आणि यात तो यशस्वी झाला. फितुरीमुळे संभाजी महाराज हाती लागले. महाराजांनी ११ मार्च १६८९ स्वराज्यासाठी बलिदान दिले.

खरोखरच महाराज अखेरपर्यत छाव्यासारखे लढले

***मौत भी डरी थी देखकर उससे....***
***ये खुद मौत का दावा है...***
***धरती को नाज था उस पर...***
***ऐसा शेर शिवा का छावा है..***
***शेर शिवा का छावा है....***

जय जिजाऊ. जय शिवराय. जय शंभूराजे

■ ■ ■

# शहीद जवानांच्या कुटुंबांसाठी एक लाख रुपयांचे योगदान

## कार्यक्रम रद्द करून आर्मी रिलीफ फंडाला दिला निधी

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १०** :
युद्ध नको बुद्ध हवा, हा संदेश जगाला मिळणे आवश्यक आहे. युद्धाला अंत नसतो हे युक्रेन आणि रशियाच्या युद्धाच्या स्थितीवरून समजते. संवेदनामधूनच भगवान गौतम बुद्ध, सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर निर्माण झाले. त्यांनी बुद्ध विचारांवर चालत शांततेचा पुरस्कार केला. शहीद जवानांच्या कुटुंबियांच्या संवेदनातूनच कार्यक्रमासाठी येणारा खर्च आर्मी रिलीफ फंडाला देण्याचा उपक्रम स्तुत्य आहे, असे प्रतिपादन रिपब्लिकन युवा मोर्चाचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी केले.

माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे आणि मित्र परिवाराच्या वतीने प्रभाग क्रमांक दोन मधील लुंबिनी उद्यानात दरवर्षी बुद्धपौर्णिमेला भीम-बुद्ध गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला जातो. यंदाच्या वर्षी शहीद जवानांना मानवंदना म्हणून हा कार्यक्रम रद्द केला. या



कार्यक्रमासाठी येणारा खर्च शहीद जवानांच्या कुटुंबीयांना देऊन आपल्या सहवेदना व्यक्त करण्याचा संकल्प डॉ. धेंडे यांनी व्यक्त केला. त्यानुसार महार बटालियनच्या निवृत्त माजी सैनिकांकडे एक लाख रुपयांचा धनादेश आर्मी रिलीफ फंड नावाने सुपूर्द करण्यात आला. या वेळी आयोजित कार्यक्रमात डंबाळे बोलत होते.

भंते नागघोष, भंते धम्मानंद, भंते प्रियदर्शी, भंते अंकुश माला आदी भिख्खूंनी त्रिसरण, पंचशील आणि धम्मदेसना दिली. या वेळी आंबेडकरी चळवळीतील रिपब्लिकन युवा मोर्चाचे अध्यक्ष राहुल डंबाळे, सुवर्णा पवार, यशवंत शिर्के, विजय गायकवाड, विजय कांबळे, गजानन जागडे, नामदेव घाडगे, सोपान लभाणे, सुभाष कांबळे, अनिल ननावरे, मेजर रणपिसे, मालती धीवार, रजनी वाघमारे, कविता घाडगे, मंगला गमरे, महार बटालियनचे कॅप्टन पोळके, सुभेदार वानखेडे आणि सहकारी उपस्थित होते.

डॉ. सिद्धार्थ धेंडे म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकारला आवाहन आहे. पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना सरकारने ५० लाख रुपये मदत म्हणून दिले आहे.

मात्र दुसरीकडे देशातील आपल्या सैनिकांना युद्धात वीरमरण आले. ते शहीद झाले की त्यांच्या कुटुंबियांना मात्र तुटपुंजी मदत दिली जाते. त्यामुळे शहीद झालेल्या वीर जवानांच्या कुटुंबियांना देखील ५० लाखांची मदत द्यावी, यावर तातडीने निर्णय घ्यावा, असे आवाहन डॉ. धेंडे यांनी केले.





# दहावीचा निकाल : विभागात बुलढाणा अव्वल, अमरावती तिसऱ्या स्थानावर

## राज्यात अमरावती विभागाची सहाव्या स्थानावर घसरण



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर करण्यात आला. यामध्ये अमरावती विभागाचा निकाल 92.95 टक्के लागला. नऊ विभागीय मंडळांमध्ये अमरावती विभाग हा सहाव्या स्थानी घसरला आहे, गेल्या वर्षी 95.58 टक्के निकालासह अमरावती विभाग राज्यात पाचव्या स्थानी होता. यंदाच्या निकालात 2.63 टक्क्यांनी घसरण झाली आहे. दुसरीकडे अमरावती विभागातून बुलढाणा जिल्हा अमरावतीमधून अव्वल स्थानी तर अमरावती जिल्हा तिसऱ्या स्थानावर आहे.

अमरावती विभागातून एकूण 1 लाख 60 हजार 664 विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. प्रत्यक्ष परीक्षेला 1 लाख 58 हजार 931 विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी 1 लाख 47 हजार 739 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विभागात निकालाच्या टक्केवारीत बुलढाणा जिल्हा अव्वलस्थानी आहे. बुलढाणा जिल्हाचा निकाल 95.52 टक्के इतका आहे. क्रमवारीनुसार दुसरे स्थान वाशीम 95.41 टक्के, अमरावती 92.83 टक्के, यवतमाळ 91.51 टक्के आणि अकोला जिल्ह्यात निकाल सर्वात कमी 89.35 टक्के लागला आहे.

परीक्षांचे निकाल लवकर जाहीर होऊन इयत्ता अकरावीचे वर्ग लवकर सुरू व्हावेत, यासाठी तसेच पुरवणी परीक्षा लवकर घेण्याच्या दृष्टीने यावर्षी प्रथमच इयत्ता दहावीची परीक्षा नेहमीपेक्षा दहा दिवस अगोदर आयोजित करण्यात आली होती. गेल्या वर्षीप्रमाणेच पेपरच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे वाढवून देण्यात आली होती.

### जिल्हानिहाय निकाल

बुलढाणा - 95.52 टक्के
वाशीम - 95.41 टक्के
अमरावती - 92.86 टक्के
यवतमाळ - 91.51 टक्के
अकोला - 89.35 टक्के

### विभागात मुलींचीच बाजी

दरवर्षीप्रमाणे यंदाही अमरावती विभागातील मुली दहावीच्या निकालात मुलांपेक्षा पुढे आहे. यंदा 95.40 टक्के मुली, तर 90.82 टक्के मुले उत्तीर्ण झाले आहे. विभागातून 84 हजार 839 मुलांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी 77 हजार 52 मुले उर्त्तिर्ण झाले, तर 74 हजार 92 मुलींपैकी 70 हजार 687 मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.

### प्राविण्य प्राप्त विद्यार्थी सर्वाधिक

अमरावती विभागात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी प्रावीण्यासह प्रथम श्रेणीत 75 टक्क्यांवरून विद्यार्थी आहेत. यामध्ये 48 हजार 530 विद्यार्थ्यांनी अधिक गुण मिळविले आहेत. प्रथम श्रेणी म्हणज 60 टक्क्यांच्या पुढे गुण मिळवणारे 48 हजार 774 विद्यार्थी आहेत. द्वितीय श्रेणी म्हणजे 45 टक्क्यांच्या पुढे गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 39 हजार 509 आणि 35 टक्क्यांच्या वर गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 10 हजार 926 इतकी आहे.

# रहाटगाव परिसरात अर्धनग्न, बेशुध्द अवस्थेत आढळली महिला

## परिसरात खळबळ, पोलिस पोहोचले घटनास्थळी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 13 )** नांदगाव पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रहाटगाव परिसरात सकाळी 6 वाजताच्या सुमारास 30 ते 40 वयोगटातील एक महिला अर्धनग्न अवस्थेत बेशुध्द अवस्थेत पडून होती. या घटनेची माहिती काही नागरिकांनी डायल 112 वर दिली. त्यानंतर पोलिस रहाटगावमधील आयटीआय रोडवर पोहोचले. त्यावेळी महिला अर्धनग्न अवस्थेत होती. या घटनेच्या माहितीवरून नांदगाव पेठ पोलिसही घटनास्थळी पोहोचले. या घटनेनंतर पोलिसांनी महिलेची चौकशी केली, परंतू तिला कुणाबद्दलही पोलिसात तक्रार द्यायची नव्हती. तिच्या नातेवाईकांनी सुध्दा तक्रार देण्यास नकार दिला. त्यामुळे ही महिला अर्धनग्न अवस्थेत या ठिकाणी कशी आली, ही बाब स्पष्ट झाली नाही. परंतू पोलिस आपल्या स्तरावर चौकशी करीत आहेत. नागरिकांनी पोलिसांना माहिती देताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. यावेळी पोलिसांनी पाहणी केली असता सदर महिला नशेत असल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी महिलेच्या घराचा शोध घेतला. त्यानंतर तिला सुखरूप घरी पोहोचविण्यात आले. महिलेचे वय अंदाजे 35 वर्ष असून, या महिलेने व तिच्या कुटुंबियांनी कोणाविरूध्दही तक्रार नसल्याचे सांगितले. त्यामुळे या प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याची माहिती नांदगाव पेठचे ठाणेदार महेंद्र अंभोरे यांनी दिली.


# अमरावती महानगरपालिका, अमरावती

**भांडार विभाग**

**फेर ई-निविदा सुचना ( दुसरी वेळ )**

जा.क्र.अमनपा/भा.वि./उपा/४०/२५
दि. ८/५/२०२५

अमरावती महानगरपालिकेच्या वतीने अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक करिता आवश्यकतेनुसार व्हिडीओग्राफी व फोटोग्राफी यंत्रणा भाडे तत्वावर पुरविण्याकरीता ई-निविदा प्रणाली द्वारे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | बयाना रक्कम | सुरक्षा रक्कम | | कोऱ्या निविदा फॉर्मची रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक करिता आवश्यकतेनुसार व्हिडीओग्राफी व फोटोग्राफी यंत्रणा भाडे तत्वावर पुरविण्याकरिता | रू. ८५,०००/- | ३% सुरक्षा रक्कम FD स्वरूपात निविदा मंजूर झाल्यानंतर द्यावी लागेल. | २% सुरक्षा रक्कम देयकातुन कपात करण्यात येईल | ५१००/- +१८% GST परत न मिळणारी | आदेश मिळाल्या पासुन ०७ दिवसात कामपूर्ण करून द्यावे लागेल. |

ई-निविदा प्रसिद्धीचा तपशिल :-

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी | दि. १३/०५/२०२५ |
| ई-निविदा दाखल करण्याची सुरवात दिनांक | दि. १३/०५/२०२५ रोजी दु. १२.०० वाजे पासुन |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि. २८/०५/२०२५ रोजी दु. ४.०० वाजे पर्यंत |
| ई-निविदा उघडण्याची दिनांक (technical) and (Financial) | दि. २९/०५/२०२५ रोजी दु. ४.०० वाजता शक्य झाल्यास |

ई-निविदा बाबतची सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या००० या संकेत स्थळावर दि. १३/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपासुन पाहता येईल.

**भांडार अधिक्षक**
**महानगरपालिका अमरावती**

**उपायुक्त-२**
**महानगरपालिका अमरावती**

**अमनपा/जसंवि/४५/२०२५ दिनांक १३/५/२०२५**


# मराठमोळे व्यक्ती, अमरावतीचे सुपूत्र न्या. भूषण गवई आज घेणार सरन्यायधिश पदाची शपथ

## मातोश्री कमल गवई यांच्यासह कुटुंबातील सर्व सदस्य दिल्लीला रवाना





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** - राष्टपती द्रौपदी मुर्मू यांनी दिली पुढील मुख्य न्यायमूर्तीसाठी भूषण गवई यांच्या नावाला परवानगी दिली आहे. अमरावतीचे, महाराष्ट्राचे सुपुत्र न्या. भूषण गवई यांची भारताचे 52 वे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भूषण गवई हे बुधवारी (दि.14) देशाचे पुढील मुख्य न्यायमूर्ती म्हणून शपथ घेणार आहे.

या शपथग्रहण सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी अमरावतीमधून न्या. भूषण गवई यांच्या मातोश्री माजी लेडी गव्हर्नर कमल गवई यांच्यासह कुटुंबातील सर्व सदस्य तसेच काही जवळची मंडळींसह अनेक जण दिल्लीला रवाना होत आहे. विशेष म्हणजे माजी महामहिम राष्टपती प्रतिभाताई पाटील यांनी देशाच्या पहिल्या महिला राष्टपती म्हणून अमरावतीच्या शिरपेचा मानाचा तुरा रोवला होता. त्यानंतर बिहार, सिक्कीम आणि केरळचे राज्यपाल म्हणून दादासाहेब गवई यांना सुद्धा सर्वोच्च मान मिळाला होता. आता त्यांचेच पूत्र न्या. भूषण गवई हे सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश म्हणून बुधवारी(दि.14) सकाळी 11 वाजता शपथ घेणार आहेत. राष्टपती द्रौपदी मुर्मू न्या. भूषण गवई यांना सरन्यायाधीशपदाची शपथ देणार आहेत. या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी न्या. गवई यांच्या मातोश्री माजी लेडी गव्हर्नर कमल गवई, त्यांचे बंधू डॉ. राजेंद्र गवई, मुलगी कृतिका गवई, दादासाहेब गवई यांचे बंधू वसंत गवई, डॉ. विश्वास गवई, न्या. गवई यांच्या भगीनी किर्ती अर्जुन, त्यांचा मुलगा धरम अर्जुन आदी कुटुंबिय, तसेच दादासाहेब गवई यांचे मानसपुत्र रुपचंद खंडेलवाल, ॲड. विजय तायडे, डॉ. भीमराज तायडे आदींसह त्यांचे जवळचे नातेवाईक, चाहते असे अनेक जण दिल्लीला जात आहेत.

### वकील संघाकडून सोहळा लाईव्ह

अमरावतीचे भूमीपूत्र न्या. भूषण गवई सरन्यायधीश पदाची शपथ घेणे हा अमरावतीच्या शिरपेचातील आणखी एक मानाचा तुरा आणि आनंदाचा क्षण राहणार आहे. हा ऐतिहासिक सोहळा अनेकांना बघता यावा, यासाठी जिल्हा वकील संघाच्या वतीने बुधवारी (दि.14) कोर्ट परिसरात मोठा स्क्रिन लावून या सोहळ्याचे लाईव्ह प्रक्षेपण करण्यात येणार आहे.


## ग्राम पंचायत कार्यालय काटकुंभ, ता. चिखलदरा , जि. अमरावती

**निविदा सूचना क्र. ०१ दिनांक १३/०५/२०२५**

ग्राम पंचायत कार्यालय काटकुंभ, ता. चिखलदरा, जि. अमरावती यांचे मार्फत विविध योजने अंतर्गत खालील कामाची मोहरबंद निविदा ब-१ टक्केवारी प्रपत्रामध्ये जि.प. बांधकाम विभाग यांचे वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारा कडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा ग्रामपंचायत कार्यालय काटकुंभ, ता. चिखलदरा, जि. अमरावती यांचा कडून देण्यात येतील.

| अ क्र | कामाचे नाव | लेखाशिर्षक | अंदाजित किंमत रुपये (लाख) | बयाना रक्कम (१%) | कामाची मुदत महीने | निविदा प्रसिद्धीची वेळ | पंजीबद्ध कंत्राटदाराचे वर्गीकरण | कोऱ्या निविदेची किंमत | कोऱ्या निविदा देण्याची व स्वीकृतीची तारीख व वेळ | निविदा उघडण्याचा तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्र.आ.केंद्र काटकुंभ छतगळती दुरुस्ती, किचन ओट्टा, पाईप लाईन पाण्याची व कर्मचारी निवासस्थान दारे खिडक्या दुरुस्ती करणे. | ०८ आरोग्य | ७,६०,०००/- | ७,६००/- | ६ महिने | प्रथम | ७ व त्यावरील | ५००/- | १३/०५/२०२५ ते १९/०५/२०२५ | २०/०५/२०२५ दु. १.०० वाजता |
| २ | काटकुंभ येथे सार्वजनिक विहिरीला लोखंडी जाळी बसविणे. | १५ वा वित्त आयोग | २,००,०००/- | २,०००/- | ३ महिने | प्रथम | ७ व त्यावरील | २००/- | १३/०५/२०२५ ते १९/०५/२०२५ | २०/०५/२०२५ दु. १.०० वाजता |
| ३ | काटकुंभ येथे शोच्चालय दुरुस्ती व अंगणवाडी दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | १,३४,५६२/- | १,३४५/- | ३ महिने | प्रथम | ७ व त्यावरील | २००/- | १३/०५/२०२५ ते १९/०५/२०२५ | २०/०५/२०२५ दु. १.०० वाजता |
| ४ | काटकुंभ येथे आदिवासी महामंडळ दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | १,१६,९११/- | १,१६९/- | ३ महिने | प्रथम | ७ व त्यावरील | २००/- | १३/०५/२०२५ ते १९/०५/२०२५ | २०/०५/२०२५ दु. १.०० वाजता |
| ५ | जि.प. शाळा काटकुंभ येथेडेक्स बेंच खरेदी व रंगरंगोटी करणे. | १५ वा वित्त आयोग | १,४४,८५३/- | १,४४८/- | ३ महिने | प्रथम | ७ व त्यावरील | २००/- | १३/०५/२०२५ ते १९/०५/२०२५ | २०/०५/२०२५ दु. १.०० वाजता |
| ६ | काटकुंभ येथे रंगभवन दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | १,५९,७०७/- | १,४९७/- | ३ महिने | प्रथम | ७ व त्यावरील | २००/- | १३/०५/२०२५ ते १९/०५/२०२५ | २०/०५/२०२५ दु. १.०० वाजता |
| ७ | जि.प. प्राथ. शाळा काटकुंभ येथे छत दुरुस्ती करणे | २२०२-जे-६३५ | ३,२५,०००/- | ३,२५०/- | ३ महिने | प्रथम | ७ व त्यावरील | २००/- | १३/०५/२०२५ ते १९/०५/२०२५ | २०/०५/२०२५ दु. १.०० वाजता |

टिप :
१) निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय काटकुंभ , ता. चिखलदरा , जि. अमरावती यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२) निविदा ह्या दोन लिफाफा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत.
३) निविदा स्वीकारण्याचे तसेच काही कारणास्तव निविदा रद्द करण्याचे अधिकार सरपंच/सचिव यांनी राखून ठेवलेले आहे.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत कार्यालय काटकुंभ**



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# जिल्ह्यातील शाळांनी निकालाची परंपरा राखली

महासागर प्रतिनिधी

*अमरावती,( दि.13 )-जिल्ह्यातील बहुतांश शाळांनी आज मंगळवारी ( दि.13 ) लागलेल्या माध्यमिक शालांत परीक्षेच्या निकालात उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवित यश मिळविल्याने विद्यार्थ्यांसह, पालक, शिक्षक व संस्थेचे पदाधिकार्यांनी समाधान व आनंद व्यक्त केला आहे.*

## जानकीबाई देशमुख माध्यमिक शाळेच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम





**अचलपूर** – येथील श्रीमती जानकीबाई देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या शाळेने या वर्षी देखील आपली उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे यावर्षी इयत्ता 10 वीचा निकाल 96 66 टक्के लागला असून एकूण 60 विद्यार्थीनीपैकी 58 विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत 12 विद्यार्थिनींनी प्राविण्य श्रेणी प्राप्त केली आहे तर प्रथम श्रेणीमध्ये 24 विद्यार्थिनींनी यश संपादन केले आहे. शाळेतून प्रथम येण्याचा मान कोमल रवींद्र पोंदे हिने मिळवला असून तिला 88.60 टक्के गुण मिळाले आहे तर कु खुशी गजानन पांडे हिने 88 .20 टक्के गुण मिळवून शाळेतून दुसरा क्रमांक मिळवला आहे तर कु जानवी संजय जयसिंगपुरे 82 .20 टक्के गुण मिळवून शाळेतून तिसऱ्या क्रमांकावर आहे तर इतर सर्व विद्यार्थीनिनी चांगले गुण मिळवून घवघवीत यश प्राप्त केले आहे सदर विद्यार्थिनींच्या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा माधुरी देशमुख संस्थेचे सचिव ॲड दीपकराव देशमुख शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता तुरखडे, पर्यवेक्षक श्रीकांत प्रसारकर व जयश्री पाटील तसेच सर्व शिक्षक वर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## अरुणोदय इंग्लिश स्कूलची 100 टक्के निकालाची परंपरा कायम

**अमरावती** – इयत्ता 10 वी मार्च 2025 चा बोर्डाच्या परिक्षेचा निकाल मंगळवारी नुकताच जाहीर झाला. वि.म.वि. परिसरातील अरुणोदय इंग्लिश स्कूल अमरावती येथील विद्यार्थ्यांनी मागील 15 वर्षाची निकालाची परंपरा कायम राखून निकाल 100 टक्के लागला. त्यामुळे अरुणोदय इंग्लिश स्कूल येथे पालकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यामध्ये प्राविण्य प्राप्त केलेले विद्यार्थी ओम संजय सोनपरोते 95.20 टक्के, श्रीजित अभिजीत देशमुख 94.80 टक्के, कृष्णा तुषार ठाकरे 94.20 टक्के, सोहम मनिष तायडे 93.80 टक्के, वेदांत धनंजय शेकोकार 93.60 टक्के, राजेश्वर चंद्रशेखर चौधरी 93. टक्के, अलंक्रिता गोपालकृष्ण चौधरी 92.00 टक्के, शिवम संजय भंगाळे 91.00 टक्के, श्रावणी विनोद टेंभुर्णे 90.60 टक्के, अदिती शरद घोंगडे 90.40 टक्के, निल पंकज गादे 90.40 टक्के, निषाद संदीप गावंडे 90.00 टक्के, नैतिक राजू मडावी 90 टक्के यांनी गुण मिळवून आपले स्थान निश्चित केले.

## चिखलदरा तालुक्यात यशाची परंपरा





**चुरणी** – चिखलदरा तालुक्यातील अनेक शाळांनी आपली इयत्ता दहावितील यशाची परंपरा कायम ठेवली. ज्यामध्ये दहेंद्री स्व.श्रीकृष्णाजी येवले विद्यालयाचा इयत्ता दहावीत 100 टक्के निकाल लागला आहे. तसेच चुरणी येथील स्वातंर्त्यवीर श्री.अजाबराव काळे पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाला 89.36 टक्के लागला आहे. येथील ट्विंकल राजेश वर्मा या विद्यार्थीनीने 92.60 टक्के तर अनिषा विजय बेठेकर या विद्यार्थीनीने 81 टक्के गुण मिळविले आहे.

## समर्थ विद्यालयाचा निकाल 99 टक्के

**अमरावती** – अमरावती शहरातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या श्रीसमर्थ शिक्षण संस्थेद्वारा संचालित श्रीसमर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने दहावी बोर्डाच्या आज जाहीर झालेल्या निकालात आपल्या यशाची परंपरा कायम राखली. शाळेचा निकाल 98.55 टक्के लागला तर तब्बल 41 विद्यार्थ्यांनी 90 व 90 टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करीत आपल्या स्वत:सह शाळेची गुणवत्ता सिद्ध केली. 115 विद्यार्थ्यांनी प्राविण्य आणि 87 विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी प्राप्त करीत शाळेचा नावलौकिक वाढवला. प्रणव विजय पातुर्डे 98.40 टक्के गुणांसह शाळेतून पहिल्या क्रमांकाचा मानकरी ठरला. शाळेतून दुसरा क्रमांक नंदिनी बंडू शेटे 98.20 टक्के तर तिसरा क्रमांक चिन्मय अमोघ सहस्त्रबुद्धे 98 टक्के , चौथा क्रमांक प्रणव पंकज दरवई 97.60 टक्के व अदिती गजानन ढगे 97.60 टक्के आणि पाचवा क्रमांक सई सुनील बिल्लाडे हिने 97.40 टक्के गुणांसह पटकावला. इतर 90 व 90 टक्क्यांच्या वर गुण असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळेचे पदाधिकारी, वर्गशिक्षक, विषय शिक्षक आणि पालकांना दिले. शालांत परीक्षेत यश प्राप्त विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे शाळेचे मुख्याध्यापक धनंजय पाठक, उपमुख्याध्यापक सचिन देवळे,पर्यवेक्षक मधुसूदन वटक, पर्यवेक्षक प्रभावती परिहार,वर्ग दहावीचे वर्गशिक्षक डॉ.सचिन देशमुख, सारिका जोशी, दीपश्री देशपांडे, संजय गायधने यांच्यासह शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक व अभिनंदन केले. श्रीसमर्थ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. वि. के. कोलवाडकर, उपाध्यक्ष प्रा. मो. रा. पुरोहित, सचिव डॉ. दे.शं. बोधनकर, कार्यकारिणी सदस्य सदस्य श्री र.ना. डांगे, सं.कृ. गोडबोले , संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक डॉ.श्री.प्र.ना.वडोदकर यांनी शालांत परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी, त्यांचे पालक तथा शालेय प्रशासन व शिक्षक कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले व विद्यार्थ्यांना उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## तिवसा येथील कृष्णाबाई दंडाळे कन्या विद्यालयाचा निकाल 99.23 टक्के








**तिवसा** – स्थानिक कृष्णाबाई दंडाळे कन्या विद्यालयाने दहावीच्या परीक्षेमध्ये यशाची परंपरा कायम ठेवत मार्च 2025 च्या निकालामध्ये भरघोस यश मिळवले आहे. विद्यालयातून एकूण 131 विद्यार्थिनी परीक्षेसाठी प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी एकूण 130 विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे शाळेचा एकूण निकाल 99.23 टक्के लागला आहे. विद्यालयातून रक्षा मुरलीधर मदनकर हिने 93.80 टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे, गार्गी सचिन केने हिने 93.60 टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक तर मैथिली जगदीश काळे हिने 93.40 टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच मनस्वी गणेश गोरे हिने 92.80 गुणांसह चतुर्थ क्रमांक व जान्हवी अरविंद मुळे हिने 92.20 टक्के गुणांसह पाचवा क्रमांक प्राप्त केला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे संस्थेचे अध्यक्ष गंगाधरराव दंडाळे, सचिव विद्याधरराव दंडाळे, संस्थेच्या सदस्या छाया दंडाळे, शाळेच्या मुख्याध्यापिका एम. टी. फाले, शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक एस. व्ही. बुरघाटे, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## जागृत ची जागृती आजनकर विद्यालयातून प्रथम




**वरुड** – स्थानिक स्व माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय वरूड येथील इयत्ता 10 वी चा निकाल 100 टक्के लागला. दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी शाळेचा निकाल उत्कृष्ट आणि यशाची परंपरा कायम ठेवली. विद्यालयाची विद्यार्थीनी जागृती नंदकिशोर आजनकर हिने 98.20 टक्के गुण मिळवून विद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळविला.

तसेच विद्यार्थीनी कोमल उत्तम बावणे हिने 97.20 टक्के गुण मिळवून विद्यालयातून द्वितीय येण्याचा मान पटकाविला. तसेच प्रांजल सुजित मालपे हिला 97 टक्के इतके गुण प्राप्त केले. या परीक्षेत विद्यालयातून 5 तुकडीतील एकूण विद्यार्थी 315 प्रविष्ट होते. त्यापैकी 161 विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत, 97 विद्यार्थी प्रथम श्रेणीत, 49 विद्यार्थी द्वितीय श्रेणीत आणि 8 विद्यार्थी उत्तीर्ण झालेत. विशेष म्हणजे 90 टक्के चे वर 35 विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालय, संस्था तसेच पालक वर्ग यांनी भरभरून कौतुक केले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय आडे, उपमुख्याध्यापक विजय गजबे, उपप्राचार्य मंदा चौधरी तसेच पर्यवेक्षक प्रदीप पाटील, तसेच सर्व मार्गदर्शक शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी त्याचप्रमाणे जागृत नवयुवक शिक्षण संस्था वरूड चे सर्व पदाधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# 120 शिबिरार्थ्यांचा व्यसनमुक्त सद्वर्तनी जीवन जगण्याचा संकल्प

### संस्कार शिबिरात 'बुद्ध जयंती' निमित्त मार्गदर्शन | लोककलावंत प्रमोद पोकळे यांचा पुढाकार

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.13 )** – हाती न घेता तलवार, बुद्ध राज्य करी जगावर या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या उक्तीनुसार प्रेमाने जग जिंकता येते, ही धारणा सत्य, ईश्वर आणि मानवी जीवनाचा उद्देश समजून केलेल्या तपश्चर्येच्या ज्ञानातून सिद्धार्थ गौतम बुद्धांनी जगातील दु:खमूळ शोधून त्यावर पंचशीलाचा प्रभावी मार्ग सांगितला. बुद्धांचे तत्त्वज्ञान आजच्या विज्ञान व तंत्रज्ञान युगातील मानवाने समजून घेतले असते तर ही युद्ध परिस्थिती निर्माण झाली नसती, त्यामुळे भगवान बुद्धांचे तत्त्वज्ञान समजून घेण्याची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे यांनी केले.



बुद्ध जयंतीचे औचित्य साधून प्रमोद पोकळे यांनी शिबिरार्थ्यांसमोर भगवान बुद्धांच्या पंचशीलाचे निरूपण केले. त्याच्या प्रभावाने राष्ट्रसंत अध्यात्म केंद्र, दासटेकडी गुरुकुंज-मोझरी येथे 1 मे पासून सुरू झालेल्या श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिरातील विद्यार्थ्यांनी जीवनात व्यसनमुक्त राहून सद्वर्तनी जीवन जगण्याचा संकल्प केला. सुखशांती व निरंतर समाधानासाठी भगवान बुद्धांनी अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी पंचशील म्हणजेच आचरण नियमावली सांगितली आहे. ईर्षा, आसक्ती, हिंसा, अहंभाव व द्वेष सोडून मानवाने पंचशील जीवनात आचरले तर आंतरिक सुखशांती, समाधान व दु:ख निवृत्ती निश्चित होते, हा बुद्धांचा विचार अर्थात् तत्त्वज्ञान म्हणजे अखिल मानवाला मिळालेले वरदान असून त्याचे खरोखर चिंतन करणे गरजेचे आहे, असेही प्रमोद पोकळे म्हणाले.


श्रीगुरुदेव राष्ट्रधर्म प्रचार संस्थेद्वारा 20 दिवसपर्यंत चालणाऱ्या या शिबिराच्या यशस्वितेसाठी शिबीर-प्रमुख रवींद्र ढवळे, रूपेश मोरे, गणेश दरवरे, योगेश मेंढे, मयुर इंगळे, वेदांत अढाऊ, नयन पऱ्हाड, ओम् नन्नावरे, कुंदन गुडधे, पुष्कर गुडधे, निवृत्ती इंदुरकर, अरुण फंदे, ह.भ.प. दिनकर चोरे, प्रमोद पोकळे, अभिनय काळे, डॉ. नरेंद्र तराळे, छगनराव मोरे, कृष्णा रायबोले तर व्यवस्थापनाची जबाबदारी रवींद्र वानखडे सांभाळत आहेत.

# थायलंडहून आणलेल्या बुद्ध मुर्तीची स्थापना

### बेनोडा शहीद येथे बुद्ध पौर्णिमा साजरी

महासागर प्रतिनिधी

**वरुड,( दि.13 )** – तालुक्यातील बेनोडा शहीद येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त थायलंड येथून आणलेल्या भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. ही मुर्ती गावकऱ्यांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. यावेळी बुद्ध पौर्णिमेनिमित्त गावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात



आले होते. थायलंड येथून दान मिळालेली भगवान बुद्धाची मूर्तीचे आकर्षक सजावट करून बुद्धम-शरणम-गच्छामिच्या गजरात गावातून कॅण्डल रॅली द्वारे गावातून भ्रमण करण्यात आले. त्यानिमित्त भोजनदानाचा कार्यक्रम पार पडला. अन्य धर्मियांनी सुद्धा या कॅन्डल मार्चचे स्वागत केले व भगवान गौतम बुद्धाच्या मूर्तीचे दर्शन घेतले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे संचालन राजू दहीवडे तर आभार प्रदर्शन धीरज बारस्कर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वस्वी धीरज बारस्कर, रितिक गजभिये, शैलेश नारनवरे, रघुनाथ घरडे, मोहन शेंडे, रंजना गजभिये, दीपिका दहिवडे, सीमा ब्राह्मणे, प्रीती वावरे, सीमा वावरे, कल्पना कापसे, वंदना जाऊरकर यांनी परिश्रम घेतले.

### चिंचरगव्हाण शिवारातून बोअरवेलची मशीन चोरली

**अमरावती**– वरूड ठाण्याच्या हद्दीतील चिंचरगव्हाण शिवारातील एका शेतातून बोअरवेलची मशीन चोरून नेण्यात आली. ही घटना 11 मे रोजी उघडकीस आली. वरूड येथील रहिवासी चंद्रकांत दिनेशराव गुल्हाने (32) यांचे चिंचरगव्हाण शिवारात शेत आहे. या शेतातील बोअरवेलची 48 हजार रुपये किमतीची मशीन अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

# ग्रीननेटने जमले नाही, आता राखेभोवती लावले मातीचे ढिगारे

### राख हलविल्याशिवाय पर्याय नसल्याची स्थिती

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 13 )** राष्ट्रीय महामार्गावरील रहाटगाव रिंगरोड येथे उड्डाणपुलाचे बांधकाम करणाऱ्या जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीकडून मोठ्या प्रमाणात अनधिकृत राख साठवण्यात आल्याने परिसरातील नागरिकांना आणि वाहनचालकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. वाऱ्यामुळे उडणारी ही राख थेट चालकांच्या डोळ्यात जात असल्याने अपघाताचा धोका वाढत आहे.माध्यमांनी या गंभीर समस्येकडे लक्ष वेधल्यानंतर आणि मंगेश तायडे यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे तक्रार सादर केल्यानंतर कंपनीने राखेभोवती ग्रीन नेट बसवली. मात्र, ही उपाययोजना अपुरी ठरली असून राखेचे उडणे सुरूच आहे. परिणामी, प्रशासनाच्या दबावामुळे जांडू कन्स्ट्रक्शनने राखेभोवती आता मातीचे ढिगारे साठवले, परंतु हे प्रयत्नही निष्फळ ठरत असल्याचे दिसत आहे.



गत आठवड्यात राख उडत असल्यामुळे जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीने प्रशासनाच्या दबावाला कंटाळून राखेभोवती ग्रीन नेट बसविली मात्र दोन तीन दिवसांपासून सुरू असलेल्या वातावरण बदलामुळे व प्रचंड हवेमुळे ही राख महामार्गावर उडून चालक,प्रवासी व नागरिकांच्या डोळ्यात शिरत आहे.यामध्ये दोन तीन छोटे अपघात देखील झालेत मात्र तारीख निर्लज्ज प्रशासन कोणत्याही प्रकारची दखल घेत नसल्याचे दिसत आहे. यातच प्रदूषण विभागाने ही राख उडत असल्याचे थांबत नसल्यामुळे जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीला राखेभोवती मातीचे ढिगारे लावण्याचा सल्ला दिला मात्र तोही कुचकामी ठरत असल्याचे दिसत आहे. यामुळे स्पष्ट होते की, प्रदूषण नियंत्रण मंडळ, महानगरपालिका आणि तहसील कार्यालयातील संबंधित अधिकारी जांडू कन्स्ट्रक्शनच्या प्रभावाखाली काम करत असून नागरिकांच्या जीविताशी खेळ केला जात आहे. उडणाऱ्या राखेमुळे परिसरातील हवामानात प्रदूषणाचा स्तर वाढला असून नागरिकांना श्वसनाचे त्रास जाणवू लागले आहेत.या प्रकरणी शिवसेना (उबाठा गट) चे अमरावती तालुका प्रमुख नितीन हटवार यांनी तीव्र संताप व्यक्त करत प्रदूषण विभागाला घेराव घालण्याचा इशारा दिला आहे. जनतेचा जीव धोक्यात घालून काही अधिकारी मलई खात आहेत, हे सहन केले जाणार नाही, असा इशारा हटवार यांनी दिला. जर तत्काळ योग्य उपाययोजना न करण्यात आल्यास ही समस्या गंभीर रूप धारण करेल. प्रशासनाने जनतेच्या जीविताला प्राधान्य देऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# विभागीय लोकशाही दिनात 31 प्रकरणांवर सुनावणी

### प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करा – विभागीय आयुक्त श्वेता सिंघल

महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.13 )** – लोकशाही दिनासाठी प्राप्त अर्जावर विहित कालमर्यादेत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित अर्जदारांना कळविणे प्रशासनाचे काम आहे. विभागीय लोकशाही दिनासाठी दाखल झालेल्या प्रकरणांसंबंधी मुद्देनिहाय चौकशी, तपासणी करुन तत्काळ निराकरण करावे, तक्रार अयोग्य असल्यास तसे अर्जदारास कळवावे. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनी येवू नये, याची संबंधित विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी आज येथे दिले.



यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण 31 प्रकरणांवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सहा प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर उर्वरित प्रकरणांवर पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम अहवाल सादर करण्याच्या सूचना सिंघल यांनी संबंधित विभागाला दिल्या.

विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. अपर आयुक्त रामदास सिध्दभट्टी, उपायुक्त अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, राजू फडके, तहसीलदार प्रज्ञा काकडे, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्यासह पोलीस, महापालिका, महसूल, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून यावेळी बैठकीला उपस्थित होते. विभागीय लोकशाही दिनासाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे सादर करण्यात आलेल्या 12 स्वीकृत अर्जांपैकी दोन प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच 19 अस्वीकृत अर्जांपैकी 4 प्रकरणे निकाली काढण्यात आली. एकूण 31 अर्जांवर सविस्तर चर्चा आजच्या विभागीय लोकशाही दिनात झाली. लोकशाही दिनासाठी विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करुन अंतिम अहवाल तत्काळ सादर करण्यात यावा. तक्रार अयोग्य असल्यास खारिज करुन संबंधितांना कळविण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त सिंघल यांनी संबंधितांना दिले. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. लोकशाही दिनासाठी दाखल केलेल्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

# वजन कमी करणे : आरोग्य तज्ज्ञ दिवसभर ऊर्जा मिळण्यासाठी आरोग्यदायी स्नॅकिंग पर्यायांची शिफारस



**डॉ. रोहिणी पाटील, एमबीबीएस आणि न्यूट्रिशनिस्ट**

**नागपूर, १३ मे :** आपल्या शारीरिक वजनाबाबत काळजी घेणाऱ्यांसाठी आहारांदरम्यान लागणारी भूक त्रासदायक ठरू शकते. यामुळे मनसोक्त स्नॅक्सचा आस्वाद घेतला जातो, जे अनारोग्यकारक असतात. परिणामत: आहारसंबंधित केलेल्या संकल्पामध्ये अडथळा येतो. पण यासाठी स्नॅकिंगला दोषी ठरवले जाऊ शकत नाही. योग्य पद्धतीने व प्रमाणात आरोग्यदायी स्नॅक्सचे सेवन केल्यास वजन वाढण्याऐवजी वजन कमी होण्यास मदत होऊ शकते. एमबीबीएस व न्यूट्रिशनिस्ट डॉ. रोहिणी पाटील यांच्या मते, नियंत्रित प्रमाणात बदाम, फळे व भाज्या अशा पोषण संपन्न फूड्सचे सेवन करणे महत्त्वाचे आहे. या स्मार्ट स्नॅकिंग निवडींमुळे भूकेवर नियंत्रण राहण्यासोबत आवश्यक पौष्टिक घटक देखील मिळतात, जे तुम्हाला दिवसभर ऊर्जा देण्यासोबत भूकेचे शमन करतात. डॉ. पाटील सांगतात की खरी समस्या स्नॅकिंग नाही, तर आपण किती व कसे सेवन करतो हे महत्त्वाचे आहे. पौष्टिकतेचे योग्य संतुलन असलेल्या स्नॅक्सचे सेवन करत आरोग्यसंबंधित ध्येयांचे पालन होऊ शकते, तसेच फूडचा देखील आस्वाद घेता येऊ शकतो.

भूकेचे शमन करण्यासोबत वजन कमी करण्याच्या ध्येयाशी संलग्न राहण्यास मदत करण्यासाठी काही आरोग्यदायी स्नॅक्स पर्याय पुढे देण्यात आले आहेत.

**मूठभर बदाम :** बदामांमध्ये प्रोटीन, मॅग्नेशियम, व्हिटॅमिन ई व झिंक यासह १५ आवश्यक पौष्टिक घटक असतात. बदामांचा कुरकुरीतपणा आणि नैसर्गिकदृष्ट्या मन भरणारी चव बदामांना भूकेचे शमन करण्यासाठी पसंतीचा स्नॅक बनवते. बदामांमुळे हृदयाचे आरोग्य, त्वचेचे आरोग्य उत्तम राहते, तसेच भूकेचे शमन होते. यामुळे बदाम वजनाचे व्यवस्थापन करण्यासाठी योग्य आहेत.

डॉ. पाटील विशेषत: कॅलिफोर्निया बदामांची शिफारस करतात, ज्यामध्ये नॅच्युरल प्रोटीन, आरोग्यदायी फॅट्स व फायबर असते, तसेच व्यक्तींना दीर्घकाळपर्यंत पोट भरल्यासारखे वाटण्यास मदत करते. हे बदाम अत्यंत पौष्टिक आहेत, ते कच्चे खाता येतात, स्मूदीजसोबत मिसळता येतात, सलाड्समध्ये टाकता येऊ शकता किंवा मसाल्यांसह भाजता येऊ शकतात.

**मूग डाळ चिला :** तेलाशिवाय नॉन-स्टिक तव्यावर शिजवण्यात येणारा मूग डाळ चिला वजन कमी करण्यास मदत करणारा स्नॅक आहे. वनस्पती-आधारित प्रोटीन व फायबर असलेले ते भूकेवर नियंत्रण ठेवण्यास आणि ऊर्जा कायम राखण्यास मदत करते. डॉ. पाटील त्याच्या पौष्टिकतेमध्ये वाढ करण्यासाठी पालक, कांदे व टोमॅटो यांसारख्या बारीक चिरलेल्या भाज्या टाकण्याचा सल्ला देतात.

मूग डाळीमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह व तांबे संपन्न प्रमाणात असतात, जे अन्नपचनास आणि हृदयाचे आरोग्य उत्तम ठेवण्यास मदत करतात.

**स्प्राउट्स भेळ :** मूग आणि चने स्प्राउट्सपासून बनवलेला हे कुरकुरीत, तिखट स्नॅक भूकेचे शमन करण्यासोबत अत्यंत पौष्टिक देखील आहे. काकडी, टोमॅटो, कैरी आणि लिंबाचा रस घालून बनवलेली स्प्राउट्स भेळ फायबर, व्हिटॅमिन ए, सी व के आणि कॅल्शियम व लोह यांसारखे मिनरल्स देते.

कमी ग्लायसेमिक इंडेक्ससह ते रक्तातील शर्करेचे प्रमाण स्थिर ठेवण्यास मदत करते आणि ऊर्जा पातळ्या स्थिर ठेवते, जे वजनावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी परिपूर्ण आहे.

**काकडीच्या सॅलडसह पनीरचे तुकडे :** प्रोटीनयुक्त स्नॅक्सचा शोध घेत असलेल्या शाकाहारींसाठी पनीर उत्तम पर्याय आहे. पनीर स्नायूबळ कायम ठेवण्यास, हाडांचे आरोग्य उत्तम ठेवण्यास आणि भूकेचे शमन करण्यास मदत करते. डॉ. पाटील ताज्या, कमी-कॅलरीयुक्त फूडसाठी साध्या पनीरच्या तुकड्यांसह कापलेली काकडी आणि लिंबाचा रस व थोडा मसाला यांच्यासह खाद्यपदार्थ तयार करण्याचा सल्ला देतात, जे हायड्रेटिंग आणि पौष्टिक आहे.

**भाजलेले चने :** भाजलेले चने सोयीस्कर, उच्च-प्रोटीनयुक्त, उच्च-फायबर असलेला स्नॅक आहे, ज्यामध्ये फॅट्स आणि कॅलरीज कमी असतात. ते लोह, फॉस्फरस, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन बी सारखे आवश्यक पोषक घटक देतात.

हे कुरकुरीत चने रक्तातील शर्करेचे प्रमाण स्थिर ठेवण्यास मदत करतात आणि भूक लागण्याला प्रतिबंध करतात, ज्यामुळे ते आरोग्यदायी स्नॅकिंग रूटिनमध्ये उत्तम भर आहेत.

# शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेडने FY25 मध्ये २५,००० दशलक्ष महसुलाचा टप्पा पार



**नागपूर, १३ मे :** आम्हाला FY25 मध्ये उल्लेखनीय आर्थिक कामगिरी नोंदवल्याचा आनंद आहे, जी सर्व प्रमुख निर्देशांकांमध्ये मोठ्या वाढीने चिन्हांकित झाली आहे. आम्ही आमचा आतापर्यंतचा सर्वाधिक महसूल २५,१६२ दशलक्ष नोंदवला, ज्यामध्ये ८३.६% ची वार्षिक वाढ झाली, तर PAT उल्लेखनीयपणे १८८.२% ने वाढून ४,०८४ दशलक्ष झाला. ही प्रभावी टॉपलाइन वाढ आमच्या देशांतर्गत तसेच निर्यात व्यवसायातील मजबूत कामगिरीमुळे झाली, ज्यात नफा आणि मार्जिन आमच्या सातत्यपूर्ण कार्यक्षमतेवर केंद्रित असलेल्या दृष्टिकोनामुळे आणखी बळकट झाले. शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेडचे चेअरमन, दिनेश पाटीदार यांनी कंपनीच्या कामगिरीवर भाष्य केले.

आमच्या आर्थिक शिस्तीचे प्रतिबिंब FY25 मध्ये आम्ही जास्त महसूल असूनही 'रेसीवेबल डेज' लक्षणीयरीत्या कमी करण्यात यशस्वी झालो आहोत यामध्ये दिसून येते. रेसीवेबल डेज FY24 मध्ये १७८ दिवसांहून अधिक होते, जे FY25 मध्ये १५२ दिवसांपर्यंत खाली आले, आणि आम्हाला विश्वास आहे की हा ट्रेंड पुढील काही वर्षांत सुधारत जाईल. निर्यात व्यवसाय सतत मजबूत कामगिरी दर्शवत आहे, जो FY25 मध्ये ५२.७% ने वाढून ४,३६८ दशलक्ष झाला आहे. USA, आफ्रिका, आशिया आणि मध्य पूर्व यांसारख्या भागांमधील आमची मजबूत उपस्थिती याची खात्री देते की हा व्यवसाय स्थिर आणि टिकाऊ राहील.

१६,५४६ दशलक्ष इतक्या मजबूत ऑर्डर बुक आणि सातत्याने मिळणाऱ्या नवीन ऑर्डर्समुळे FY26 आणि त्यानंतरच्या काळात आमची भक्कम वाढ होईल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे. सध्या आमच्याकडे असलेल्या ऑर्डर्सशिवाय महाराष्ट्र, राजस्थान आणि हरियाणा या राज्यांमधूनही सातत्याने नवीन मागण्या येत आहेत. त्याचबरोबर, मध्य प्रदेश आणि पंजाबसह इतर अनेक राज्यांमध्येही आम्ही सक्रियपणे निविदा सादर केल्या आहेत. या राज्यांमध्ये आमची भक्कम उपस्थिती आणि बाजारातील वाटा लक्षात घेता, आम्ही लक्षणीय नव्या ऑर्डर्स मिळवू, असा विश्वास आम्हाला आहे.

आम्हाला भविष्यातील अफाट संधींबाबत खूपच आशावाद आहे. सध्या भारतातील सौर पंप उद्योग झपाट्याने विस्तारत असून, केंद्र व राज्य सरकारांच्या विविध उपक्रमांमुळे याला चालना मिळत आहे. उदाहरणार्थ प्रधानमंत्री कुसुम योजना (PM KUSUM), मागेल त्याला सौर कृषी पंप योजना (महाराष्ट्र), आणि प्रधानमंत्री कृषक मित्र सूर्य योजना (मध्य प्रदेश). त्याचबरोबर, सौर रूफटॉप क्षेत्रही मोठ्या प्रमाणावर संधी घेऊन येत आहे, आणि सूर्य घर: मोफत वीज योजना सारखे उपक्रम या वाढीला आणखी गती देत आहेत.

आमचे दूरदृष्टीपूर्ण धोरण, मजबूत ऑर्डर बुक आणि कार्यक्षमतेवर असलेला भर यामुळे पुढील काळात आमची वाढ आणि यश सुनिश्चित होईल.

# अभिनेत्रींनी संयुक्त कुटुंबांमध्ये मोठे होत असताना मिळालेल्या शिकवणींना उजाळा दिला!



**मुंबई, १३ मे :** संयुक्त कुटुंबं घरापेक्षा अधिक असतात. ते जीवनाचा मार्ग आहेत, जे संयुक्त मूल्ये, दृढ नाती आणि आजीवन आठवणींना चालना देतात. तडजोड करण्याची कला अवगत करण्यापासून एकतेमध्ये ताकद शोधण्यापर्यंत अशा जवळीक असलेल्या कुटुंबांमध्ये मोठे होत असताना बहुमूल्य शिकवणी मिळतात, जे आपण जे काही आहोत त्यांना आकार देतात. इंटरनॅशनल फॅमिली डेनिमित्त एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री संयुक्त कुटुंबांमध्ये लहानाचे मोठे होत असताना त्यांच्यामध्ये बिंबवलेल्या सखोल शिकवणींबाबत सांगत आहेत. या अभिनेत्री आहेत स्मिता साबळे (धनिया, 'भीमा'), सोनल पनवार (मलायका, 'हप्पू की उलटन पलटन') आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'भीमा'मधील स्मिता साबळे ऊर्फ धनिया म्हणाल्या, ''बारा सदस्य असलेल्या संयुक्त कुटुंबामध्ये मोठी होत असताना मला एकता व शेअरिंगचा खरा अर्थ समजला. आम्ही सर्व टेबलवर एकत्र जेवू शकत नसल्यामुळे आम्हाला जेवणासाठी दोन गट करावे लागायचे, पण जेवणासंबंधित त्या वेळा आजही आमच्या मनात खोलवर रूजलेल्या आहेत. त्यामध्ये हास्य, कहाण्या आणि आपलेपणाची भावना सामावलेली होती. त्या वातावरणाने मला आपल्या अवतीभोवती असलेल्या व्यक्तींसोबत दृढ नाते असण्याचे महत्त्व शिकवले. आजही मालिका 'भीमा'च्या सेटवर मी माझ्या सह-कलाकारांसोबत जेवणाचा आस्वाद घेण्याची खात्री घेते. आम्ही एकत्र हसतो, आमच्यामध्ये दृढ नाते आहे आणि सेटवर देखील घरी असल्यासारखे वाटते. माझा दृढ विश्वास आहे की, एकतेमधून प्रत्येक नाते अधिक दृढ होते आणि मी जेथे जाते तेथे हे मूल्य सोबत घेऊन जाते.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील सोनल पनवार ऊर्फ मलायका म्हणाल्या, ''संयुक्त कुटुंबामधील जीवनाने मला बहुमूल्य शिकवणी दिल्या. माझी चुलत भावंडं माझे जिवलग मित्र होते, आम्ही एकत्र खेळलो, भांडलो आणि प्रत्येक क्षणाचा एकत्र आनंद घेतला. रस्त्यांवर क्रिकेट खेळायचे असो किंवा रात्री लाइट गेल्यानंतर आकाशातील ताऱ्यांखाली झोपायचे असो त्या क्षणांनी मला शिकवण दिली की शेअर केल्यास आनंद वाढत जातो. आजही, आपलेपणाची ती भावना मला भावूक करते. मुंबईमध्ये माझ्या मैत्रिणी आहेत, ज्या कुटुंबाच्या सदस्य असल्यासारखे वाटते आणि मी नेहमी त्यांच्यासाठी उपलब्ध असते. सेटवर देखील आम्ही गेम्स खेळतो आणि एकमेकांची काळजी घेतो. संयुक्त कुटुंबामध्ये लहानाची मोठी झाली असल्यामुळे मला नाते कसे वाढवावे हे माहित आहे आणि ही शिकवण आजीवन लक्षात ठेवेन.'' मालिका 'भाबीजी घर पर है'मधील विदिशा श्रीवास्तव ऊर्फ अनिता भाबी म्हणाल्या, ''संयुक्त कुटुंबामधील जीवनाने मला खूप सपोर्ट दिला. निश्चितच आम्ही टीव्हीचा रिमोट किंवा स्नॅक कोणी खाल्ले अशा गोष्टींवर एकमेकांशी भांडलो, पण एकमेकांच्या पाठिशी उभे राहताना आम्ही नेहमी एकमेकांना खूप पाठिंबा दिला. त्या अनुभवाने मला आवडणाऱ्या व्यक्तींना नेहमी विश्वासाने पाठिंबा देण्याची शिकवण दिली. आज, मी कुटुंब, मित्र किंवा सहकारी असो प्रत्येक नात्यामध्ये या शिकवणींचा वापर करते. प्रियजनाला माझी मदत किंवा आधाराची गरज असेल तर मी कोणतीही चौकशी न करता पूर्णपणे पाठिंबा देते. एकता, निष्ठा व प्रेमाचा तो उत्साह माझ्या संयुक्त कुटुंबामधील संगोपनाचा वारसा आहे.''

# जे अँड के बँकेने नवीन टेक-फर्स्ट रुपे क्रेडिट कार्ड केले लाँच

**नागपूर, १३ मे :** जागतिक फिनटेक प्लॅटफॉर्म, पाइन लॅब्स आणि भारतातील खाजगी क्षेत्रातील जम्मू आणि काश्मीर बँकेने भारतातील बँकेच्या ग्राहकांसाठी युपीआय वर आधारित एक नवीन टेक-फर्स्ट रुपे क्रेडिट कार्ड लाँच केले आहे. सहज क्रेडिट व्यवहारांसाठी रुपे क्रेडिट कार्ड युपीआय शी देखील जोडले जाऊ शकते. पाइन लॅब्सच्या क्रेडिट प्लस प्लॅटफॉर्मवर विकसित केलेले हे एकत्रीकरण युपीआय द्वारे पूर्व-मंजूर क्रेडिट लाइन्सची अखंड प्रक्रिया करण्यास सक्षम करेल.

कार्ड आधारित पेमेंट भारतात झपाट्याने बदलत आहे. क्रेडिट कार्डने डेबिट कार्डांना मागे टाकले आहे. मार्च २०२३ मध्ये एकूण सुमारे ८५ दशलक्ष क्रेडिट कार्ड जारी करण्यात आले होते, तर मार्च २०२५ पर्यंत ही संख्या सुमारे ११० दशलक्ष होईल. रुपे क्रेडिट कार्डमध्ये युपीआय चे एकत्रीकरण भारतात डिजिटल पेमेंटचा अवलंब करण्यास गती देईल.

क्रेडिट प्लस हे एक पुढच्या पिढीतील कार्ड व्यवस्थापन प्लॅटफॉर्म आहे जे भारतातील आणि जगभरातील कार्ड जारीकर्त्यांना क्रेडिट, डेबिट, प्रीपेड आणि इतर पेमेंट सेवा प्रदान करण्यास सक्षम करते. क्रेडिट प्लस मुळे जारीकर्ते आणि त्यांच्या भागीदारांना त्यांच्या डिजिटल प्लॅटफॉर्ममध्ये वित्तीय सेवा एकत्रित करता येतात. हे खर्च व्यवस्थापन, क्रेडिट लाइन व्यवस्थापन, डिजिटल वॉलेट, रिवॉर्ड्स, इंधन आणि फ्लीट व्यवस्थापन, किशोर आणि कॅम्पस कार्ड इत्यादी विविध वापरांसाठी एकल अखंड अंतिम वापरकर्ता अनुभव आणि असंख्य फिनटेक पायाभूत सुविधा कार्यप्रवाह सक्षम करते. क्रेडिट प्लस, त्याच्या डोमेन-समृद्ध पेमेंट कार्यक्षमतेसह, जारीकर्त्यांना कॉन्फिगरेशन-नियंत्रित वैशिष्ट्ये देते जी त्यांना सानुकूल करण्यायोग्य शुल्क संरचना आणि फायद्यांसह उत्पादन प्रकार तयार करण्यास आणि लाँच करण्यास मदत करतात. हे अंतिम वापरकर्त्यासाठी वापरण्यास खूप सोपे करते. क्रेडिट+ मध्ये आधुनिक आणि लवचिक तंत्रज्ञानाचा स्टॅक आहे. ते अनुप्रयोगांभोवती विविध प्लॅटफॉर्म आणि इतर परिसंस्था खूप लवकर एकत्रित करू शकते.

युपीआय वर क्रेडिट कार्ड सक्रिय करण्यासाठी, पाइन लॅब्सने वेगवान नेटवर्कद्वारे व्यवहार स्मार्टपणे राउट करण्यासाठी प्लॅटफॉर्मवर स्वत:चे युपीआय स्विच तयार केले आहे आणि ते एकात्मिक केले आहे, ज्यामुळे व्यवहार अयशस्वी होण्याचा दर कमी होतो हे स्विच युपीआय पेमेंटच्या सर्व वैशिष्ट्यांना अखंडपणे एकत्रित करू शकते ज्यात ऑटोपे, पेमेंट बाय लिंक, ई-रुपी, आर क्यूआर कोड आणि क्रेडिट कार्ड पेमेंट यांचा समावेश आहे.

पाइन लॅब्स ही एनपीसीआय पार्टनर प्रोग्राम (एनपीपी) ची सदस्य आहे, जी आधुनिक बाजारपेठेच्या गरजांशी सुसंगत जलद प्रमाणपत्रे आणि उत्पादन लाँचिंग सक्षम करते. ही प्रक्रिया एनपीपीमुळे शक्य झाली आहे, जी तिच्या प्लॅटफॉर्मद्वारे मासिक कार्यशाळा, सुलभ ऑनबोर्डिंग, प्रभावी प्रमाणपत्र आणि अधिक दृश्यमानता प्रदान करते. एनपीसीआयसोबतच्या या भागीदारीमुळे पाइन लॅब्स एक विश्वासार्ह रुपे भागीदार म्हणून स्थापित झाले आहेत.

पाइन लॅब्सचे सीईओ बी अमरीश राऊ म्हणाले, क्रेडिट कार्डसारख्या क्रेडिट सुविधांसाठी आजचा शुभारंभ हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. जे अँड के बँकेसाठी, हे जागतिक दर्जाचे क्रेडिट जारीकर्ता प्लॅटफॉर्म मोठ्या प्रमाणात फिनटेक उत्पादने सक्षम करण्यासाठी यूपीआयच्या सामर्थ्यावरील आमचा विश्वास दृढ करते. आम्ही एक पूर्णपणे अनुपालन करणारा क्रेडिट+ प्लॅटफॉर्म तयार केला आहे जो ग्राहकांना आरबीआयच्या नियमांनुसार पेमेंट नेटवर्कमध्ये स्विच करण्याची क्षमता देईल.

जम्मू-काश्मीर बँकेचे मोहम्मद मुझफ्फर वाणी (आयटी आणि बीपीआर) म्हणाले की, क्रेडिट प्लस प्लॅटफॉर्मवर यूपीआय इंटिग्रेटेड रुपे क्रेडिट कार्ड लाँच करण्यास आम्हाला खूप आनंद होत आहे. यामुळे आमच्या ग्राहकांना सुरक्षित, सोपे आणि नाविन्यपूर्ण डिजिटल सोल्यूशन प्रदान करण्याचे आमचे उद्दिष्ट पूर्ण होते. लवकरच ते सुरू होत असताना आम्हाला एक अखंड डिजिटल अनुभव देण्यासाठी खूप आनंद होत आहे.

# ऑनस्क्रीन दुश्मन, ऑफस्क्रीन समर्थकः सोनल आणि सिमरन यांचा जमाई नं.१मधील नाते

**मुंबई, १३ मे :** झी टीव्हीवरील मालिका जमाई नं.१ आपल्या मनाची पकड घेणारे कथानक आणि नाट्यमय वळणे यांसह प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. मालिकेत नुकत्याच पार पडलेल्या एका दृश्यात सायली (सोनल वेंगुर्लेकर) आणि रिद्धी (सिमरन कौर) यांच्यात जबरदस्त नृत्य सामना झाला. ह्या दृश्याने अर्थातच मालिकेत ठिणग्या, तणाव आणि भावना आणल्या, बिहाईंड दि सीन्स मात्र हा सोनलसाठी खासगी स्तरावरील विजय होता कारण हा परफॉर्मन्स देण्यासाठी तिला आपल्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडावे लागले.

ह्या मालिकेत एका प्रशिक्षित नृत्यांगनेची भूमिका साकारत असलेल्या सायली प्रत्यक्षात मात्र कधी प्रोफेशनली नृत्य केलेले नाहीये. तिने प्रांजळपणे हे कबूलही केले आहे की नृत्य कधीच तिचे बळकट कौशल्य नव्हते. तरीही जेव्हा कथानकानुसार तिला तिची सहकलाकार सिमरनसोबत नृत्याचा सामना करायचा होता तेव्हा तिने माघार न घेता हे आव्हान स्वीकारले. थोड्या कालावधीच्या तयारीसह सोनलने सराव केला आणि आपल्या कोरियोग्राफरसोबत अथक काम केले आणि सिमरनकडून काही फायदेशीर टिपाही मिळवल्या, जी तिची ऑनस्क्रीन दुश्मन पण ऑफस्क्रीन सर्वांत मोठी समर्थक आहे.

सोनल म्हणाली, मी खरंच थोडी नर्व्हस झाले होते जेव्हा मी पहिल्यांदा ह्या नृत्याच्या सीनबद्दल ऐकले. मी नृत्याचे प्रशिक्षण घेतलेले नाहीये त्यामुळे ते माझ्या कम्फर्ट झोनच्या बाहेरचे होते. पण एक अभिनेत्री म्हणून मला आव्हाने स्वीकारायला आवडतात आणि ह्या गोष्टीकडे मी विकासाची एक संधी म्हणून पाहिले. टीमचे खूप छान समर्थन मला मिळाले आणि खासकरून सिमरनचे, तिने मला ठेका समजायला मदत केली आणि खूप प्रोत्साहन दिले. अखेरीस मला असे वाटले की मी काहीतरी मोठे मिळवले आहे आणि त्यासाठी मेहनत आणि सुबकता लागली. हे असेच क्षण आहेत जे मला आठवण करून देतात की एक अभिनेत्री बनणे मला का आवडते, कारण तुम्ही कायम शिकत असता, प्रगल्भ होत असता आणि स्वत:ला तसेच प्रेक्षकांना सरप्राईज करत असता.

# युरेका फोर्बज् तर्फे स्वच्छ, आरोग्यदायी भारतासाठी श्रद्धा कपूरची ब्रँड ॲम्बेसडर म्हणून नियुक्ती




**मुंबई, १३ मे :** आरोग्य आणि स्वच्छता उद्योगातील भारतातील आघाडीची कंपनी युरेका फोर्बज लिमिटेडने त्यांच्या प्रतिष्ठेच्या व्हॅक्युम क्लिनर्सच्या श्रेणीसाठी अभिनेत्री श्रद्धा कपूरला ब्रँड ॲम्बेसडर म्हणून घोषित केले आहे. चार दशकांहून अधिक काळ लाखो भारतीय घरांमध्ये विश्वासार्हतेने सेवा देणाऱ्या या कॅटेगरी लीडरच्या या सहयोगामुळे युरेका फोर्बज्च्या स्वच्छता आणि आरोग्यदायी जीवनशैलीसाठी घेतलेल्या वचनबद्धतेत महत्त्वपूर्ण टप्पा गाठण्यात आला आहे.

व्हॅक्युम क्लिनिंगच्या क्षेत्रात बाजारपेठेतील अग्रणी आणि चार दशकांहून अधिक काळ जपलेल्या परंपरेसह युरेका फोर्बज्ने भारतीय घरांमध्ये नेहमीच अत्याधुनिक गृह स्वच्छता तंत्रज्ञान आणले असून त्याला अतुलनीय सर्व्हिस नेटवर्कचा आधार आहे. नवीन फोर्बज स्मार्ट क्लिन रोबोटिक व्हॅक्युम क्लिनर्स शक्तिशाली सक्शन आणि वेट मॉपिंग यांचे एकत्रीकरण करून सहजतेने फरशी चकाचक करतात. AI आणि नेक्स्ट-जेन LiDAR तंत्रज्ञानाद्वारे ही स्मार्ट उपकरणे अचूकता, बुद्धिमत्ता आणि अतुलनीय सुविधा पुरवितात. श्रद्धा कपूरसोबत भागीदारी करताना युरेका फोर्बज्चे उद्दिष्ट आजच्या तरुण, शहरी ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचे आहे. ते स्मार्ट आणि आरोग्यदायी जीवनशैलीला महत्त्व देतात. या भागीदारीद्वारे युरेका फोर्बज घरांना स्वच्छ आणि आरोग्यदायी उपाय सुविधांनी सक्षम करणे हे आपले ध्येय अधिक बळकट करत आहे.

युरेका फोर्बज सोबतच्या आपल्या सहभागाबाबत बोलताना श्रद्धा कपूर म्हणाली, युरेका फोर्बज् कुटुंबाचा भाग होणे ही माझ्यासाठी अत्यंत आनंदाची बाब आहे. स्वच्छ घर हा आरोग्यदायी मन आणि शरीराचा पाया असतो असे मला नेहमीच वाटले आहे. आपण ज्या जागांमध्ये राहतो त्या आपल्या दैनंदिन कार्यक्षमतेवर मोठा प्रभाव टाकतात. युरेका फोर्बज हा ब्रँड दीर्घकाळापासून स्वच्छ आणि आरोग्यदायी जीवनशैलीचे प्रतिनिधित्व करत आला आहे आणि स्वच्छ राहणीमान हे आपले कायमस्वरूपी ध्येय असलेल्या ब्रँडसोबत जोडले जाणे मला अभिमानास्पद वाटते. फोर्बज स्मार्ट क्लिन रोबोटिक्स सारखी नाविन्यपूर्ण उत्पादने बुद्धिमान तंत्रज्ञान आणि सहज, सुलभता यांचा मिलाफ आहेत. त्याद्वारे युरेका फोर्बज घरगुती स्वच्छतेचे भविष्य नव्याने परिभाषित करत आहे. मला खरोखर आशा आहे की आपण एकत्र मिळून अधिकाधिक लोकांना ही जीवनशैली स्वीकारण्यासाठी प्रेरित करू शकू.

युरेका फोर्बज लिमिटेडचे मुख्य विकास अधिकारी श्री. अनुराग कुमार म्हणाले, युरेका फोर्बज कुटुंबात व्हॅक्युम क्लिनर्सच्या ब्रँड ॲम्बेसडर म्हणून श्रद्धा कपूरचे स्वागत करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. सजग जीवनशैली, स्मार्ट निवडी आणि उद्देशपूर्ण नाविन्यपूर्ण उपक्रमांना महत्त्व देणाऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व ती करते. या सर्व गोष्टी आमच्या ब्रँडच्या मूल्यांशी सुसंगत आहेत. युरेका फोर्बज मध्ये आम्ही ४० वर्षांहून अधिक काळ घरगुती स्वच्छतेच्या उपाययोजनांमध्ये अग्रगण्य आहोत आणि आमच्या नवीन फोर्बज स्मार्ट क्लिन रोबोटिक्स रेंजसह आम्ही आजच्या घरांमध्ये सहजतेने मिळवू शकणाऱ्या स्वच्छतेचे स्वरूपच बदलून टाकत आहोत. श्रद्धाचा प्रामाणिकपणा आणि आताच्या काळातल्या भारतीय घरांशी असलेली तिची घट्ट नाळ तिला आमच्या 'एक स्मार्ट घर, एक स्वच्छ भारत' या प्रवासासाठी परिपूर्ण सहयोगी बनवते.

ग्राहक-केंद्रित दृष्टीकोनासह युरेका फोर्बज्नेहमीच अशा नाविन्यपूर्ण, सहज समजणाऱ्या आणि कार्यक्षम व्हॅक्युम क्लिनर्सद्वारे बाजारपेठेमध्ये अग्रणी राहिला आहे. हे व्हॅक्युम क्लिनर्स घरगुती स्वच्छता सुलभ आणि प्रभावी बनवतात. रोबोटिक क्लिनर्सपासून डीप-क्लिनिंग व्हॅक्युम्सपर्यंतच्या विस्तृत श्रेणीसह या ब्रँडने आधुनिक घरांच्या सतत बदलणाऱ्या गरजांनुसार स्वत:ला सतत विकसित केले आहे.

# सीलीने पुण्यात सुरु केली सीली स्लीप गॅलरी

**लक्झरी मॅट्रेसच्या नवीन श्रेणीचे उद्घाटन**



**पुणे, १३ मे :** जगप्रसिद्ध मॅट्रेस ब्रँड सीली इंडियाने पुण्यात सीली स्लीप गॅलरी चे भव्य उद्घाटन केले. अजमेरा व्हेंचर्स यांच्या मार्फत सुरु करण्यात आलेली ही गॅलरी आयसीसी टेक पार्क (प्लॉट ए), जे.डब्लू मॅरिअट शेजारी, ग्राउंड फ्लोअर येथे स्थित आहे. सुमारे १३०० चौरस फूट जागेवर उभारलेली ही गॅलरी पुण्यातील लक्झरी स्लीप अनुभवाची नवीन ओळख निर्माण करणार आहे.

गॅलरीचे उद्घाटन सीलीचे चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. जॉर्ज डायर, जनरल मॅनेजर श्री. जी. एस. एस जगन्नाथ, आर्किटेक्ट श्री. अजिंक्य धुमाळ आणि फ्रँचाईजी मालक श्री. राजकुमार व श्री. पदमकुमार कुमार अजमेरा यांच्या हस्ते झाले.

या उद्घाटनप्रसंगी श्री. जॉर्ज डायर म्हणाले, राजकुमार आणि पदमकुमार अजमेरा हे Sealy Posturepedic ब्रँडचे जुने आणि विश्वासू भागीदार आहेत. त्यांचे कौशल्य आणि निष्ठा यामुळे ही गॅलरी ग्राहकांना चांगली सेवा आणि उत्कृष्ट प्रॉडक्ट रेंज देईल. या गॅलरीमध्ये सीली Posturepedic च्या नवीनतम संग्रहांचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या टेक्नॉलॉजीसोबत स्थानिक कारागिरीचा संगम येथे दिसतो. सीलीच्या Elevate, Elevate Ultra, PostureSense आणि Palatial Crest या विविध प्रकारच्या मॅट्रेसची रेंज येथे उपलब्ध आहे.

सीली मॅट्रेसची किंमत रुपये ५५,००० पासून सुरू होऊन ११ लाखांपर्यंत जाते. यामध्ये सीलीची खास IceTouch टेक्नॉलॉजी, ऑर्थोपेडिकली डिझाईन्ड सपोर्ट आणि प्रीमियम कम्फर्ट लेयर्सचा समावेश आहे.

सीली इंडिया ने सप्टेंबर २०२४ मध्ये हैदराबादमध्ये आपले पहिले उत्पादन केंद्र सुरु केले असून, तेथून भारतातील ग्राहकांसाठी स्थानिक गरजांनुसार उत्पादने तयार केली जात आहेत.

## आज का अंदाज

बुधवार १४ मे २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ६ | ९ | २ | ३ | ७ | ८ |
| १५७ | २४८ | १५० | १८० | ११० | १२० | १६० | १३४ |
| २३८ | ३४७ | ३३० | ३६० | २०० | ३०० | ३४० | २६० |
| ४९० | ४४६ | ७९० | २७० | ३९० | ३४६ | २५० | ३५० |
| ३४ | ४२ | ६२ | ९१ | २४ | ३२ | ७३ | ८२ |
| ३५ | ४६ | ६४ | ९३ | २५ | ३४ | ७४ | ८४ |
| ३७ | ४७ | ६७ | ९७ | २९ | ३६ | ७० | ८७ |

**१४ मे : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | ३२ | ५२ | ८२ |
| १५ | ३५ | ५४ | ८४ |
| १७ | ३६ | ५७ | ८७ |

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस साधारण असेल. पैशांच्या व्यवहारात तुम्हाला सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. आरोग्यासंबंधी काही लहान-मोठ्या तक्रारी जाणवल्या तर त्याबद्दल जास्त काळजी करू नका.

**वृषभ :** आज ऑफिसमध्ये काही विशेष काम सोपवले जाऊ शकते, जे तुमच्या प्रमोशनसाठी महत्त्वाचे ठरेल. अविवाहित लोकांना गुडन्यूज मिळेल. आज कोणीतरी खास व्यक्ती भेटण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** आज पदोन्नती होण्याची शक्यता आहे. आर्थिकदृष्ट्या आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ असेल. मात्र, आपल्या आरोग्यावर लक्ष ठेवणे महत्त्वाचे आहे. जंक फुड खाणे टाळा.

**कर्क :** आज बाहेरचे अन्न खाणे टाळा. राजकारणात जास्त लक्ष घालू नका. तुमच्या कुटुंबाशी संबंधित, करिअर, आर्थिक व्यवहारात बदल होतील. आरोग्याची काळजी घ्या. सकारात्मक विचार करा.

**सिंह :** आजचा दिवस चांगला असणार. आपल्या करिअरमधील ध्येय साध्य करण्यासाठी योग्य योजना तयार करा. बचत करण्यावर लक्ष केंद्रित केल्यास तुमची आर्थिक स्थिती सुधारेल.

**कन्या :** तुमच्या जीवनात आनंद आणि उत्साह टिकून राहील. करिअरच्या दृष्टीने आजची परिस्थिती चांगली राहील. आजचा दिवस खूप चांगला असणार आहे. करिअरच्या क्षेत्रात तुम्हाला नवीन संधी मिळू शकतात.

**तुळ :** तणाव कमी करण्यासाठी योगाचा आणि ध्यानधारणेचा अवलंब करावा. आपल्या पार्टनरसोबत वेळ घालवा. डेटवर जाण्याचा विचार करा. आपल्या शरीराला तंदुरुस्त ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करा.

**वृश्चिक :** आजचा दिवस त्यांच्या क्रिएटीव्हीला वाव देणारा असेल. आर्थिक बाबतीत तुम्हाला नशिबाची साथ मिळू शकते. विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.

**धनु :** आज आरोग्य चांगलं राहील. पण तुम्हाला हंगामी आजार झाला असेल तर त्वरित उपचार घ्या. बाहेरचे अन्नपदार्थ खाणे टाळा. पोटाशी संबंधित समस्या जाणवू शकतात. काळजी घेणे आवश्यक आहे.

**मकर :** आज व्यवसायात चांगले उत्पन्न मिळण्याचे संकेत आहेत. व्यवसायिक सहल फायदेशीर ठरेल. अडकलेले पैसे अचानक मिळू शकतात. वैयक्तिक परिस्थिती लक्षात घेऊन आर्थिक योजना बनवा.

**कुंभ :** आज व्यवसायात उत्पन्न कमी आणि खर्च जास्त असेल. घर आणि व्यवसायाच्या ठिकाणाच्या सजावटीवर किंवा सुविधांवर जास्त पैसे खर्च होऊ शकतात. उत्पन्नाच्या स्रोतांकडे लक्ष पुरवा.

**मीन :** कामाच्या निमित्ताने काही लोकांना विदेशात प्रवास करण्याची संधी मिळते. तुम्ही तुमच्या प्रिय व्यक्तीसोबत डेटवर जाऊ शकतात. आजचा दिवस सकारात्मक ऊर्जा घेऊन येईल.


# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## पायाभुत सुविधा विकास कक्ष, नागपूर

**जाहिर ई-निविदा सुचना क्र. १/२०२५-२६**

भंडारा जिल्हयातंर्गत ११ ठिकाणी उपकेंद्र व २ ठिकाणी बीपीएचयुचे मंजूर कामे करण्याकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील दर्शविल्याप्रमाणे **Online** निविदा **http://mahatenders.gov.in** वर ई-टेंडरींग पध्दतीने मागवित आहे.

**ई-निविदा (प्रथम प्रसारण) कामांची संख्या १३**

**ऑनलाईन निविदा विक्री- दिनांक १४/०५/२०२५**

आरोग्य संस्थाची बांधकामे व दुरुस्तीचे खालीलप्रमाणे **Online** ई-निविदा महाराष्ट्र आरोग्य शासनाच्या **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावरुन पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदे संबधीची सर्व माहिती व अटी / शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. ही निविदा फक्त इंटरनेटवरुनच खरेदी करता येईल व इंटरनेटवरूनच भरता / दाखल करता येईल. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणे अथवा रदद करणेचे अधिकार राखुन ठेवण्यात आले आहेत.

सही/-
विभागीय कार्यकारी अभियंता
नागपूर मंडळ, नागपूर

# रविराज देशमुख, प्रभुदास भिलावेकर जिल्हाध्यक्ष, तर डॉ.धाडे शहराध्यक्ष

## भाजपकडून जिल्हा पदाधिकाऱ्यांची निवड

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.13)-** अमरावती जिल्ह्यात भाजपाने तीन अध्यक्ष दिले आहे. आतापर्यंत अमरावती ग्रामीण व शहर जिल्हाध्यक्ष अशी दोन पदे होती. आता भाजपादृष्ट्या मेळघाट हा नवीन जिल्हा करण्यात आला आहे. अमरावती ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी रविराज देशमुख यांची तर मेळघाट भाजपा जिल्हाध्यक्षपदी माजी आमदार प्रभुदास भिलावेकर आणि अमरावती शहर जिल्हाध्यक्षपदी डॉ. नितीन धांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



डॉ. नितीन धांडे



रविराज देशमुख



प्रभुदास भिलावेकर

तिवसा, मोर्शी, धामणगाव रेल्वे, बडनेरा ग्रामीण अशा साडेतीन विधानसभा क्षेत्रासाठी रविराज देशमुख हे जिल्हाध्यक्ष असतील तर मेळघाट, अचलपूर, दर्यापूर या तीन विधानसभा मतदारसंघासाठी प्रभुदास भिलावेकर हे जिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळतील. अमरावती विधानसभा व बडनेरा मतदारसंघातील शहरी भाग अशा दीड विधानसभा क्षेत्राचे अमरावती शहर जिल्हाध्यक्ष म्हणून डॉ. नितीन धांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसापासून जिल्हाध्यक्ष पदांच्या नावाची चर्चा सुरू होती अनेक नावे चर्चेला आली होती अखेर नावे जाहीर झाल्याने चर्चेला पूर्णविराम लागला आहे. नावे जाहीर होताच अनेकांची निराशा झाल्याचे पाहायला मिळाले.

# शिक्षक कर्मचाऱ्यांना जूनी पेन्शन योजना मिळणारच

## सुप्रिम कोर्टातून न्याय मिळण्याचा शिक्षकांना विश्वास

### राज्य शिक्षक संघाची अमरावतीत सभा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.13)-** शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जूनी पेन्शन योजना लागू करण्याचे प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात असून न्यायालयातून योग्य न्याय मिळून शिक्षकांना जूनी पेन्शन योजना निश्चित लागू केली जाईल, असा विश्वास राज्य शिक्षक संघाच्या सभेत सहभागी झालेल्या प्रतिनिधींनी व्यक्त केला. आमदार संजय खोडके यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा कायदा असल्यामुळे सर्वांनाच पेन्शन मिळेल असे आमदार संजय खोडके यावेळी बोलताना म्हणाले.

जुनी पेन्शन योजना मिळविण्याच्या लढ्यातील महत्त्वपूर्ण पाऊल ठरलेल्या पेन्शन मार्गदर्शन सभेचे आयोजन आज राज्य शिक्षक संघाच्या वतीने आरसीएन सभागृह, हॉटेल ग्रेस इन, राजापेठ, अमरावती येथे उत्साहात पार पडले. या सभेला शिक्षकांचा मोठा प्रतिसाद लाभला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रदीप महल्ले (हिंगणघाट) यांनी उपस्थित शिक्षकांना सर्वोच्च न्यायालयातील जुन्या पेन्शन योजनेसंबंधी प्रगतीची सविस्तर माहिती दिली. त्यांनी ठामपणे सांगितले की, 2005 पूर्वी नियुक्त सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना मिळणारच.

सभेचे प्रास्ताविक राज्य शिक्षक संघाचे संस्थापक दिलीप कडू यांनी केले. त्यांनी शासन निर्णय (30 ऑक्टोबर 2005) आणि 2010 च्या परिपत्रकातील महत्त्वाचे मुद्दे विशद केले. नियुक्ती दिनांकच पात्रतेचा मुख्य आधार आहे हे त्यांनी अनेक उदाहरणांद्वारे स्पष्ट करुन दिले. सभेला प्रमुख उपस्थिती म्हणून दीपक बोकडे (चंद्रपूर), सचिन पिसे (चिमूर), प्रफुल पुलगमकर (हिंगणघाट), प्रवीण दिवे (अध्यक्ष, अमरावती जिल्हा मुख्याध्यापक संघ), भोजराज काळे (सरचिटणीस, राज्य शिक्षक संघ), ललित चौधरी (विभागीय संघटक), अनिल भारसाकडे (जिल्हाध्यक्ष), प्रदीप नानोटे, गजानन मानकर व जिल्ह्यातील आणि तालुक्यातील राज्य शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

प्रदीप महल्ले सर सध्याच्या सर्वोच्च न्यायालयीन लढ्याची माहिती देताना सांगितले की, विधीमंडळामध्ये जुनी पेन्शन योजना देण्यात अपयश आल्यामुळेच आम्ही न्यायालयाचा मार्ग पत्करला. त्यांनी अनेक दाखले देऊन न्यायालयात सादर झालेली बाजू उलगडून सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र हगवणे (जिल्हा कार्याध्यक्ष) यांनी तर आभार प्रदर्शन प्रदीप नानोटे यांनी केले.

# भरधाव वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा घटनास्थळीच मृत्यू

## भारवाडी ते खडका पुलावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा, (दि. 13) -** भरधाव अज्ञात वाहनाने धडक दिल्याने एका 55 वर्षीय व्यक्तीचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी(दि.13) दुपारी 4.30 वा.च्या सुमारास घडली. राष्ट्रीय महामार्ग खडका (वर्धा) पुलावर घडलेल्या अपघातात मारोतराव व्यंकटराव खानजोळे (वय 55 वर्ष,रा. लहान आर्वी ता.आष्टी जि. वर्धा) असे मृताचे नाव आहे. मारोतराव खानजोळे हे आपल्या एम एच 32 ए वाय 9744 क्रमांकाच्या अँक्टिव्हा दुचाकीने अमरावतीला काही खासगी कामाकरिता गेले होते. परत प्रवासात लहान आर्वीला जात असताना भारवाडी ते खडका पुलावर अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक देऊन पळ काढला. या अपघातात मारोतराव खानजोडे यांचा घटनास्थळी मृत्यू झाला.



घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलिसांनी घटनास्थळ गाठले. अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीचा मृतदेह तिवसा उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी ठेवण्यात आले. पोलिसांनी सदर अपघात घटनेचा पंचनामा केला असून अज्ञात वाहनाचा पुढील तपास पीएसआय राजश्री चंदापुरे, पो.कॉन्स्टेबल सागर करीत आहेत.

# घरासमोरील अतिक्रमण काढा अन्यथा अन्नत्याग

## डोंगरयावलीच्या पांडव कुटुंबाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,(दि.13) -** घरासमोर त्रास देण्याच्या उद्देशाने हेतूपूरस्सर करण्यात आलेले अतिक्रमन काढण्यात मोर्शी नगर परिषद प्रशासन टाळाटाळ करित असल्याने डोंगरयावली येथील पिडित पांडव कुटुंब संतप्त झाले असून संपूर्ण कुटुंबाने नगर परिषदेच्या या अन्याय्य वागणूकीविरोधात 15 मे पासून अन्नत्याग आंदोलन सुरु करण्याचा इशारा दिला आहे.

प्राप्त माहितीनुसार डोंगर यावली येथील रहिवासी असलेल्या संग्राम दीपक पांडव यांनी यासंदर्भात निवेदन दिले आहे. त्यानुसार त्यांच्या शेजारी राहणा ?या शिवनारायण विश्वकर्मा यांनी पांडव यांच्या घरासमोर अतिक्रमण केले



आहे. त्याचा नाहक त्रास पांडव कुटुंबाला सहन करावा लागत आहे. हे अतिक्रमन हटविण्यात यावे, याकरिता मोर्शी नगर परिषद कार्यालयाशी पांडव यांनी अनेकदा पत्रव्यवहार केलेले आहेत. प्रशासनाने त्याची दखल घेतली नाही. 4 मार्च 2025 रोजी शिवनारायण विश्वकर्मा यांना अतिक्रमण हटविणेसंदर्भात नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर 5 मे रोजी मोर्शी शहरातील संपूर्ण अतिक्रमण हटविणेसंदर्भात कार्यवाही करण्यात आली. परंतु हेतुपुरस्सरपणे शिवनारायण विश्वकर्मा यांनी केलेले पांडव यांच्यासाठी अडचणीचे ठरत असलेले अतिक्रण काढण्याची कार्यवाही मात्र करण्यात आलेली नाही.

हा एकप्रकारे अन्याय असून आमच्या कुटुंबाला विनाकारण मनस्ताप दिला जात असल्याचे पांडव यांचे म्हणणे आहे. हे अतिक्रमन तात्काळ हटविण्यात यावे, अशी विनंती त्यांनी नगर परिषद प्रशासनाला केली आहे. अन्यथा 15 मे पासून मोर्शी नगर परिषद कार्यालयासमोर संग्राम पांडव (वय 37) यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील वडील (वय 68), पत्नी (वय 33), मुलगा (वय 7), लहान बालक (वय 10 महिने) आमरण उपोषण सुरु करतील, असा इशारा देण्यात आला आहे.

# अमरावती शहर पोलिस आयुक्तांची बदली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 13)-** अमरावती शहर पोलीस आयुक्तालय क्षेत्रात पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांची बदली नागपूर येथे झाली आहे. याबाबतचे आदेश 13 मे रोजी धडकले आहे. अमरावती शहरातील कायदा व सुव्यस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांचा कार्यकाळ अत्यंत चांगला राहिलेला आहे. त्यांनी अमरावतीकरांशी आपुलकीचे नाते जोपासून आपल्या कार्याची वेगळी छाप उमटवली आहे. सर्व समाजातील उत्सव कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेऊन नागरिकांची मने जिकंली आहे. सीपी रेड्डी यांचा अमरावती पोलीस आयुक्तालयातील कार्यकाळ पूर्ण झाला आणि नागपूरला बदली झाल्याचे आदेश धडकले. सद्यास अमरावती शहरात नवे पोलिस आयुक्त कोण येणार, याबाबत आदेश जारी झालेले नाही.



# लग्नाच्या एक दिवस आधीच नियोजित वर बेपत्ता

## स्थानिक काँग्रेस पदाधिकारी हरिभाऊ मोहोड यांचा मुलगा आहे वैभव

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.13) -** लग्नाच्या एक दिवस आधी काँग्रेस नेत्याचा मुलगा बेपत्ता झाल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी काँग्रेसचे नेते आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड यांनी (दि.13) पोलिसात तक्रार दाखल केली असून सध्या बेपत्ता मुलाचा शोध घेणे सुरु आहे.



अधिक माहितीनुसार, अमरावती जिल्ह्यातील काँग्रेस नेते आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड यांचा मुलगा वैभव मोहोड याचा बुधवारी (दि.14 मे) विवाहसोहळा संपन्न होणार होता. त्याआधीच तो बेपत्ता झाल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. वैभव मोहोड हा शिवाजी महाविद्यालयात लिपिक म्हणून कार्यरत आहे. उद्या त्यांचा लग्नसोहळा पार पडणार असून लग्नाची जय्यत तयारीही करण्यात आली आहे. त्याआधीच आज मंगळवारी सकाळी सामान आणायला बाहेर जातो असं सांगून तो घराबाहेर पडला. मात्र बराच वेळ झाल्यावरही तो घरी परत न आल्याने वडिलांकडून पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे बेपत्ता झालेल्या वैभव याने सकाळीच एटीएममधून 40 हजार रुपये काढल्याची माहितीही समोर आली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास फ्रेजरपुरा पोलीस करत आहेत.

# जिल्ह्यात एफटीके द्वारे पाणी गुणवत्ता तपासणी मोहीम

## 841 ग्रामपंचायतींचा समावेश | जनजागृती अभियानालाही सुरुवात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.13)-** पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची रासायनिक व जैविक पाणी गुणवत्ता तपासणी करण्यासाठी 12 मे ते 7 जून या कालावधीत अमरावती जिल्ह्यात क्षेत्रीय तपासणी संच (एफटीके) द्वारे पाणी गुणवत्ता तपासणी व जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व 841 ग्राम पंचायतींमध्ये ही मोहीम राबवून नागरिकांना स्वच्छ, शुध्द गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलबध करून देण्याचे आवाहन अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी केले आहे.





या मोहीमेतंर्गत जनजागृती अभियान राबविण्याबाबत केंद्र शासनाने सुचना दिल्या आहेत. गावात पाणी तपासणी करण्यासाठी निवड केलेल्या व संकेतस्थळावर नोंदविलेल्या पाच महिलांची पडताळणी करणे, महिलांच्या पाणी गुणवता विषयक एफटीके प्रशिक्षणाच्या नोंदी घेणे, गावात आठवी ते दहावीमधील विद्यार्थ्यांना एफटीके किटव्दारे पाणी तपासणीचे प्रात्यक्षिक देणे, 8 ते 10 मधील विद्यार्थ्यांच्या मदतीने शाळा, अंगणवाड्या, घरगुती नळ जोडण्यामधील पाणी नमुने तपासणी करणे, डब्यूक्यूएमआयएस पोर्टलवर नोंदी घेणे, नळ पाणी पुरवठा योजना स्त्रोत, घरगुती नळजोडण्या, शाळा, अंगणवाड्यांची पाणी गुणवता तपासणी करण्यासाठी रासायनिक व जैविक एफटीके संचाचे वाटप करणे, स्थानिकांना पाणी गुणवत्ता तपासणी व त्यापासून होणारे फायदे सांगितले जाणार आहे.

या मोहिमेमध्ये सर्व शासकिय यंत्रणांनी सहभाग घेऊन पाणी गुणवत्ता तपासणी आणि सोबतच व्यापक जनजागृती करावी, असे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी सांगितले आहे.

### एफटीके म्हणजे काय

एफटीके अर्थात क्षेत्रीय तपासणी संच हे एक पोर्टेबल उपकरण असते, जे प्राथमिक स्वरूपात पिण्याच्या पाण्यातील रासायनिक आणि जैविक घटकांची तपासणी करण्यासाठी वापरले जाते. पाण्याची गुणवत्ता त्वरित ठरवणे, गावपातळीवर नागरिकांना पाण्यातील अशुद्धता ओळखण्यास मदत करणे ही प्रक्रिया या संचाद्वारे पार पाडली जाते. यामध्ये पीएच स्तर, क्लोरिन, नायट्रेट्स, फ्लोराइड,क्लोराईड, लोह, अल्कॉलिनिटी, गढूळपणा, हार्डनेस, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम तसेच जैविक प्रदूषणबाबत तपासणी केली जाते. याचा लगेच निकाल मिळतो. या संचाद्वारे पाणी पुरवठा स्त्रोत, शाळा, अंगणवाडी व घरगुती नळ जोडण्याची पाणी गुणवत्ता तपासली जाणार आहे.

# यंदा नियोजित वेळी मान्सून ची एन्ट्री

## अमरावती जिल्ह्यातील 482 गावे पूरप्रवणमध्ये



### असे आहे उपलब्ध प्रशिक्षित मनुष्यबळ

- जिल्हास्तर शोध व बचाव पथके - 24
- तालुकास्तर शोध व बचाव पथके - 168
- प्राथमिक उपचार तज्ज्ञ - 04
- स्कुबा डायव्हर्स - 02
- मास्टर ट्रेनर्स - 50
- अशासकीय संस्था (एनजीओ) - 126
- आपदा मित्र, आपदा सखी - 300
- रेडक्रॉस सोसायटी - 42

मान्सूनपूर्व सर्व नियोजन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (डीडीएमए) द्वारा पूर्ण झाले आहे. यंत्रणेतंर्गत समन्वय व नियोजनाचा आढावा 14 मे रोजी होत आहे. यामध्ये नियोजन केल्या जाईल

**सौरभ कटियार,**
**जिल्हाधिकारी, अमरावती**



### उपाययोजनांना सुरूवात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.13) -** मान्सून सध्या निकोबार बेटापर्यंत पोहोचला आहे. विदर्भात मृग नक्षत्राच्या प्रारंभाला धडकण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. जिल्ह्यात तब्बल 482 गावे पूरप्रवण आहेत. या गावांसाठी आवश्यक उपाययोजनांसह विविध विभागांद्वारे मान्सूनपूर्व तयारी केव्हा सुरू करण्यात आली आहे.

लहान-मोठ्या नदी-नाल्यांच्या काठावरील या गावांना दरवर्षी कमी-अधिक प्रमाणात पुराचा फटका बसतो. यामध्ये मोठ्या नद्यांमुळे 11 गावे बाधित होतात तर लहान नदी-नाल्यांमुळे 302 गावांना फटका बसण्याची शक्यता आहे. अमरावती तालुक्यात 62, तिवसा 45, भातकुली 34, दर्यापूर 48, अंजनगाव 56, अचलपूर 57, चांदूरबाजार 26, चांदूर रेल्वे 6, धामणगाव तालुक्यात 27 गावे पूरप्रवण आहेत. यासाठी तात्पुरत्या 700 वर निवाऱ्यांची व्यवस्था प्रशासनाद्वारे करण्यात येते. या गावांमध्ये पोहणाऱ्या 1928 व्यक्ती आहेत. शिवाय 300 वर आपदा मित्र व आपदा सखी आहेत. प्रशासनाद्वारे यापूर्वी आपदा मित्र व आपदा सखींना बॅग, लाइफ जॅकेट, हेल्मेट, कटर, सर्च लाईट, रेनकोट, मच्छरदाणी दिली गेली आहे. जिल्हास्तरीय पथकाजवळ सद्य:स्थितीत 226 लाइफ जॅकेट्स, 216 लाईफ रिंग, 109 रोप बंडल, 85 सर्च लाईट, 22 मेगा फोन, 4 इमर्जन्सी ऑक्सिजन कीट, 15 रोप, 15 इन्सुलेटेड फायरमन ॲक्स, 15 फायर इस्टींगुशर, 30 रबर ग्लोव्ज, 30 लेटर ग्लोव्ज, 6 मोटर बोट उपलब्ध आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे सुरेश महादेवराव रायबोले आणि मालाबाई सुरेश रायबोले यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन - मौजे मामराबाद, ग्रामपंच्यायत मालमत्ता क्रं. 965, (जुना मालमत्ता क्रं. 856), ता. अंजनगाव सुर्जी, जिल्हा. अमरावती.

चतुः सीमाः **पूर्व**- पळसपगार यांचे घर **पश्चिम**- रस्ता
**उत्तर**- नरेश रायबोले यांचे घर **दक्षिण**- रस्ता

सदर मिळकत नामे 'सुरेश महादेवराव रायबोले आणि मालाबाई सुरेश रायबोले' यांना ग्रामपंच्यायत खानमपूर पांढरी, मामराबाद यांचा तपशील आणि गाव नमूना 8 नुसार त्यांच्या मालकीची आहे. तसेच वरील वर्णनाची नमूद मालमत्ता ही वडीलोपार्जित आहे. त्यानंतर त्यांनी "PIRAMAL FINANCE LTD. BR AMRAVATI. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. वरील नमूद मालमत्ता कुठे गहान/राष्ट्रीयकृत/ खाजगी/पतसंस्था/ सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 (सात) दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745

## जाहीर सुचना

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे बैंक ऑफ बडोदा, शाखा अमरावती, यांचे कडे विवेक निळकंठ केराम रा. संकेत कॉलनी, तपोवन गेट जवळ, अमरावती हे खालील नमुद केलेली मालमत्ता तारण म्हणून ठेवणार आहे. सदरच्या मिळकती बाबतचे मुळ खरेदीखत दिनांक 08/09/1994 रोजी दुय्यम निबंधक अमरावती यांच्या कार्यालयात अनु. कं. 1685 वर नोंदविलेले होते. सदरचे खरेदीखत संजय बळीराम यादव यांनी निळकंठ चंपत केराम यांच्या हक्कात नोंदवुन दिलेले होते. सदरचे मुळ खरेदीखत दिनांक 24/04/2025 रोजी गाडगे नगर जवल हरविलेले आहे. या जाहीर सुचनेव्दारे सर्वाना कळविण्यात येते की, सदरच्या मिळकतीवर कोणाचाही कोणताही प्रकारचा हक्क, अधिकार, ताबा, गहाण, बोझा, जप्ती, लिझ पेंडस, कोर्ट प्रकरण किंवा इतर कुठलाही अधिकार असल्यास लेखी पुराव्यासह 15 दिवसाचे आत खालील पत्यावर कळवावे. तसे न केल्यास आमचे पक्षकार सदरची मालमत्ता तारण म्हणून करून घेण्यास मोकळे राहतील व पुढे कोणतीही उजर चालणार नाही. कावे.

**मिळकतीचे वर्णन**

नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व मनपा अमरावती चे हद्दीतील मौजा म्हसला, प्रगणे नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती येथील शेत सर्वे नं. 24/1 (अ), 5 एकर 00 गुंठे, जमीनीतील वि. अप्पर जिल्हाधिकारी साहेब अमरावती कोर्ट यांनी रे. के. नं. एन. ए. पी. 34/म्हसला/71/1990-91, नि. ता. 30/11/1992 प्रमाणे कन्व्हर्शन मंजूर केलेल्या व मा. प्रशासन व नियोजन प्राधिकरण अमरावती म. न. पा. याचे दिनांक 19/05/1990 च्या आदेशान्वये पत्र क. अ. म. न. पा. सं.सं.न.र./अभि/159 दिनांक 21/06/1990 चे पत्रातील शर्ती व अटी नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजुर झालेल्या जागेतील प्लॉट क. 18 याचे एकुण क्षेत्रफळ 297 चौ. मी. (3195.72 चौ. फुट) आहे. सदरच्या प्लॉट वर महानगरपालिका अमरावती यांच्या दिनांक 09/12/1994 रोजीच्या बांधकाम परवानगी हुकुम नं. 544 अन्वये बांधकाम केलेले असुन याची चतु:सिमा येणेप्रमाणे.

**पुर्वेस** :- प्लाट क. 19, **पश्चिमेस** :- लेआऊट मधील 9 मी. रुंदीचा रोड,
**उत्तरेस** :- लेआऊट मधील 9 मी. रुंदीचा रोड, **दक्षिणेस** :- सर्व्हे नं. 24 चा उर्वरित भाग.
तारीख 07/05/2025

कोर्ट शिक्का

**ॲड. हरिश बी. तापडिया**
**देवरणकर नगर, बडनेरा रोड, अमरावती**

# निरामय

## चयापचय क्रिया म्हणजे काय?



चयापचय क्रियेबाबत आजवर बरंच काही लिहिलं आणि बोललं गेलं आहे. मात्र ही क्रिया म्हणजे नेमकं काय, चयापचय क्रियेमुळे शरीराला कोणते लाभ होतात, याबाबत फारशी माहिती नसते. चयापचय क्रिया म्हणजे नेमकं काय हे जाणून घेण्याचा हा एक प्रयत्न...


चयापयच ही नैसर्गिक क्रिया आहे. या क्रियेबाबत आपण फार काही करू शकत नाही. वजनवाढ आणि चयापचय क्रिया यांचा संबंध जोडला जातो. मात्र या क्रियेचं कार्य एवढ्यापुरतं मर्यादित नाही. चयापयच क्रियेमुळे बरंच काही साधलं जातं. चयापचय क्रियेचं वर्णन करायचं तर आपल्या शरीरात होणारी रासायनिक प्रक्रिया म्हणजे चयापचय क्रिया असं म्हणावं लागेल. श्वास घेणं, स्नायूंची हालचाल, अन्नपचन, ऊर्जेची निर्मिती हे सगळ चयापचयामुळे शक्य होतं. आपल्या शरीराच्या विविध क्रियांसाठी ऊर्जेची गरज असते. त्यामुळे ही ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी लागणाऱ्या कॅलरी म्हणजे चयापचय असंही म्हणता येईल. काही लोकांच्या चयापचय क्रियेचा वेग अधिक असतो तर काहींचा कमी असतो. काहींच्या शरी–राला इतरांपेक्षा अधिक ऊर्जेची म्हणजे कॅलरींची गरज असते. त्यामुळे चयापचयाचा वेग वाढतो. यामुळे वजनवाढीवर नियंत्रण मिळवता येतं. भरपूर खाल्ल्यानंतरही काहींचं वजन वाढत नाही. वेगवान चयापचय क्रियेमुळे असं घडतं.

जाणून घ्या

आता चयापचय क्रियेचा वेग वाढवणं शक्य आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. चयापचय क्रियेचा वेग वाढवणं शक्य आहे. मात्र हा वेग काही अंशांपर्यंतच वाढवता येईल. स्ट्रेंथ ट्रेनिंगच्या माध्यमातून चयापयच क्रियेचा वेग वाढू शकतो. काही औषधांच्या सेवनामुळे चयापचय क्रियेचा वेग वाढू शकतो किंवा कमी होऊ शकतो. सकाळी पूर्णधान्याचं सेवन केल्यामुळे चयापचय क्रिया सुधारते. वजन कमी झाल्यामुळे चयापचय क्रियेचा वेग मंदावू शकतो. वय वाढल्यानंतर चयापचय क्रिया मंदावते. वय वाढल्यानंतर हालचालींवर मर्यादा येत असल्याने चयापचय क्रियेचा वेग कमी होतो.

## थायरॉइड नियंत्रणासाठी

अनेकांना हायपोथायरॉईडिझमचा त्रास असतो. भारतात दहा पैकी एका व्यक्तीला या विकाराने ग्रासलं आहे. निरोगी जगण्यासाठी थायरॉईड नियंत्रणात असणं गरजेचं असतं. हार्मोन्सचं असंतुलन हे थायरॉईडचं मूळ कारण आहे. आहारातल्या काही बदलांमुळे थायरॉईड नियंत्रणात ठेवता येतो.



आरोग्य व्यवस्थापन

* ॲव्होकॅडो हे विविध पोषक घटकांनी समृद्ध फळ आहे. यात पोटॅशियम तसंच इतर काही पोषक घटक असतात. यामुळे रक्तातल्या साखरेची पातळी नियंत्रणात रहायला मदत होते. तसंच हार्मोन्सचं संतुलन साधलं जातं. यामुळे थायरॉईड ग्रंथीचं काम सुरळीत सुरू रहायला मदत होते.


* हिरव्या पालेभाज्यांमधल्या पोषक घटकांमुळेही हार्मोन्सचं संतुलन साधलं जातं. त्यामुळे आहारात अशा भाज्यांचा समावेश करायला हवा.

* विविध प्रकारच्या माशांमध्ये ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स असतात. या पोषक घटकामुळे शरीराचा दाह कमी होतो. रोगप्रतिकारकशक्ती वाढते तसंच हृदयविकाराचा धोका अनेक पटींनी कमी होतो.

* थायरॉईड ग्रंथींचं कार्य सुरळीत सुरू रहाण्यासाठी आयोडिन आणि सेलेनियम या घटकांची गरज असते. हे दोन्ही घटक अंड्यातून मिळू शकतात. यासोबतच प्रथिनं आणि टायरोसिन हे घटकही अंड्यातून मिळतात. त्यामुळे अंड्यांचा आहारात समावेश करायला हवा.

## हर्निया शस्त्रक्रिया आता अधिक सुरक्षित

हर्नियामध्ये आपल्या शरीरातील नैसर्गिक किंवा अनैसर्गिक छिद्रांतून एखादा अवयव, इंद्रिय किंवा त्या अवयवाचा भाग बाहेर येतो. शस्त्रक्रिया ही हर्नियाच्या सर्वात महत्वाच्या उपचारांपैकी एक आहे. शस्त्रक्रियेतील प्रगतीमुळे आधुनिक हर्निया शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित बनली असून त्यातून रुग्ण लवकर बरा होतो, शिवाय शस्त्रक्रियेनंतर होणाऱ्या



गुंतागुंतीचं प्रमाणही कमी झालं आहे. तीव्रता आणि परिणामानुसार हर्नियाचे अनेक प्रकारांमध्ये वर्गीकरण केलं जातं. पोटाच्या खालच्या भागात हर्निया जास्त प्रमाणात आढळून येतो. जांघेत, मांडीच्या अगदी वरच्या भागात, बेंबीत, क्वचित फुप्फुस, मेंदू, स्नायू किंवा चरबी यांचा हर्निया होऊ शकतो.

हर्निया वाढत असेल किंवा त्यामुळे दुखत असल्यास त्यावरून त्याच्यावर करण्यात येणारे उपाय ठरवले जातात. हर्नियाची ओपन किंवा लेप्रोस्कोपिक सर्जरी करून तो बरा केला जातो. हर्निया मोठा होत असतो किंवा अस्वस्थता आणि वेदना होत असतात, तेव्हा लवकर शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला जातो.

आरोग्यविशेष

डॉ. विजय क्षीरसागर

आधुनिक शस्त्रक्रिया पद्धतींनी हर्निया उपचारांच्या परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. लेप्रोस्कोपिक शस्त्रक्रियेत एका छोट्या कॅमेऱ्याचा आणि छोट्या उपकरणांचा वापर केला जातो. लेप्रोस्कोपिक शस्त्रक्रियेत अगदी छोटे छेद दिल्यामुळे हर्नियाच्या आसपासच्या उतींना कमीत कमी हानी पोचते.

नेहमीच्या शस्त्रक्रियेमध्ये (ओपन शस्त्रक्रियेत) मोठे छेद देऊन स्नायू कापून परत शिवले जातात; साहजिकच हर्निया परत होण्याची शक्यता अधिक असते. रोबोटिक हर्निया शस्त्रक्रिया केल्यास ती शक्यता कमी होते. कोणत्याही शस्त्रक्रियेनंतर भविष्यात आतडी एकमेकांना अथवा पोटाच्या स्नायूंना चिकटू शकतात; मात्र रोबोटिक हर्निया शस्त्रक्रिया केल्यास हे प्रमाण खूप कमी होतं. यामुळे दैनंदिन कामांना लवकर सुरुवात करता येते.

काही वेळा 'एक्सटेंडेड टोटली एक्स्ट्रापेरिटोनियल' ही शस्त्रक्रिया पद्धत हर्नियाच्या उपचारांसाठी वापरली जाते. यात पेरिटोनियमच्या बाहेरून, म्हणजे पोटातल्या अवयवांना स्पर्श न करता, दुरुस्ती केली जाते. या तंत्राचा वापर इनग्युनल, वेंट्रल किंवा लंबर हर्नियाच्या उपचारांसाठी केला जाऊ शकतो. याचे फायदे म्हणजे आतड्यांसंबंधी दुखापत होण्याचा धोका कमी होतो. ज्या व्यक्तींनी पूर्वी पोटाची शस्त्रक्रिया केली आहे, त्यांच्यासाठी ही योग्य उपचार पद्धती आहे.

ट्रान्सव्हर्सस ॲबडोमिनिस रिलीज ही मोठ्या, गंभीर किंवा वारंवार होणाऱ्या व्हेंट्रल हर्नियासाठी एक अत्याधुनिक व प्रभावी प्रक्रिया ठरते. यात स्नायूंना जास्त ताण न देता प्रभावी उपचार केले जातात. ही थेरपी पोटाच्या भिंतीवरील दबाव कमी करते आणि त्यामुळे पुनरावृत्तीचा धोका कमी होतो. पोटाच्या भिंतीच्या पुनर्बांधणीचा एक भाग म्हणून मोठ्या हर्नियाच्या दोषांच्या बाबतीत हे केलं जातं. गुंतागुंत होण्याचा धोका कमी करण्यासाठी आणि हर्निया दुरुस्त करण्यासाठी इथे स्नायूंच्या थरांमध्ये जाळी ठेवली जाते. वयोवृध्दांना स्थानिक भूल देऊन शस्त्रक्रिया केली जाते. काही मोठ्या किंवा गुंतागुंतीच्या हर्नियासाठी ओपन सर्जरी योग्य ठरते आहे.

हर्निया शस्त्रक्रियेनंतर जलद रिकव्हरीसाठी शस्त्रक्रियेनंतर योग्य काळजी घेणे गरजेचे आहे.

* वेदना कमी करण्यासाठी डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांचा वापर करणं.
* शस्त्रक्रियेची जागा स्वच्छ ठेवणं आणि जखमेची काळजी घेण्यासाठी तज्ज्ञांच्या सूचनांचं पालन करणं गरजेचं असतं.
* किमान तीन महिने शारीरिकदृष्ट्या कठीण क्रिया टाळणं.
* गुंतागुंत टाळण्यासाठी हलका व्यायाम करणं.
* हर्नियाची लक्षणे दिसून आल्यावर पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी त्वरित वैद्यकीय मदत घेणं गरजेचं आहे.

## वारंवार तहान लागतेय?

तहान लागणं ही एक सामान्य प्रक्रिया आहे. उन्हाळ्यात तुम्हाला पुन्हा पुन्हा काहीतरी प्यावंसं वाटू शकतं; पण दिवसभर पुन्हा पुन्हा तहान लागली, पाणी प्यायल्यानंतर काही वेळातच घसा पुन्हा कोरडा झाला तर त्याकडे दुर्लक्ष करणं धोकादायक ठरू शकतं. काहीवेळा ही एक सामान्य गोष्ट आहे; परंतु ती सवय झाली तर हे काही आजारांचं प्रारंभिक लक्षणदेखील असू शकतं. वारंवार तहान लागण्याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे मधुमेह. शरीरातील साखरेची पातळी जास्त असते, तेव्हा किडनी ते फिल्टर करण्यासाठी जास्त लघवी तयार करते. त्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता भासते आणि वारंवार तहान लागते. उष्णतेमुळे, जास्त घाम येणं, उलट्या किंवा जुलाबामुळे शरीरात पाणी कमी होण्याचा त्रास होऊ शकतो. या स्थितीला निर्जलीकरण (डिहायड्रेशन) म्हणतात. त्यामुळे तोंडाला कोरड पडते आणि वारंवार तहान लागते. याकडे दुर्लक्ष केल्यास इतर अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.



आरोग्यचर्चा

डॉ. दत्तात्रय मुळे

जास्त मीठ किंवा फास्ट फूड खाल्लं, तर वारंवार तहान लागते. मीठ संतुलित करण्यासाठी शरीराला पाण्याची जास्त गरज असते. मीठामुळे शरीरातली सोडियमची पातळी वढते आणि पुन्हा पुन्हा तहान लागते. ताप किंवा संसर्ग होतो तेव्हा शरीर गरम होते आणि जास्त पाण्याची गरज भासते. विशेषत: विषाणूजन्य ताप किंवा लघवी संसर्गामध्ये तहान वाढू शकते. निद्रानाश किंवा तणाव झोपेची कमतरता आणि मानसिक ताण शरीरातील द्रव संतुलनावर परिणाम करू शकतो. त्यामुळे पुन्हा पुन्हा पाणी पिण्याची इच्छा होऊ शकते. मधुमेह इन्सिपिडस ही एक वेगळ्या प्रकारची व्याधी आहे. यात शरीर पाणी टिकवून ठेवू शकत नाही. त्यामुळे वारंवार लघवी होणं आणि जास्त तहान लागणं, ही लक्षणं आढळून येतात. हा प्रकार गंभीर वाटत असेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## विषारी धातू ठरताहेत धोकादायक

जगभरात अनेक ठिकाणी माती आर्सेनिक, कॅडमियम, कोबाल्ट, क्रोमियम, कॉपर, निकेल आणि शिसे अशा विषारी धातूंनी प्रदूषित झालेली आहे. ही माहिती 'सायन्स' या मासिकातील एका अहवालात देण्यात आली आहे.



डेयी हो आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या संदर्भात संशोधन केल. त्यांनी १,४९३ प्रदेशांतील मातीच्या जवळपास आठ लाख नमुन्यांचे विश्लेषण केले. या अभ्यासानुसार, जगातील सुमारे १४ ते १७ टक्के शेतीयोग्य जमीनीत किमान एका विषारी धातूची पातळी सुरक्षिततेच्या मर्यादेपेक्षा अधिक असल्याचं आहे.

* जमिनीतील या प्रदूषणामुळे अन्नसुरक्षा, परिसंस्था आणि सार्वजनिक आरोग्य धोक्यात येतात. पीक उत्पादनात घट येते आणि अन्न साखळीत विषारी धातूंचा समावेश होतो. त्यामुळे किडनीचे विकार, कर्करोग, मज्जासंस्थेशी संबंधित समस्या आणि शारीरिक वाढीमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात.

जीवनशैली

डॉ. महेश दाळे

* या धातूंनी समृद्ध पट्टा युरेशिया भागात आढळतो. हा धोकादायक भाग नैसर्गिक घटक (धातूंनी समृद्ध खडक, ज्वालामुखी क्रिया) आणि मानवी हस्तक्षेप (खनिज उत्खनन, औद्योगिकीकरण, सिंचन) यांचा एकत्रित परिणाम आहे. * हवामान आणि भूप्रदेश यांचाही धातूंच्या साठ्यांवर प्रभाव असतो. * याला आळा बसावा म्हणून अभ्यासकांनी कडक पर्यावरणीय नियमावली, सुधारित मृदा परीक्षण, शाश्वत शेती पद्धती आणि जनजागृती मोहिमेची मागणी केली आहे.

## प्रौढ वयात मूत्रमार्गाच्या संसर्गात वाढ

सध्या तापमानाचा पारा वाढत आहे. उन्हाळा तीव्र होत जातो, तशा आरोग्याच्या समस्या तोंड वर काढू लागतात. या काळात ३५ ते ५० वयोगटातील प्रौढांमध्ये मूत्रमार्गाच्या संसर्गात (यूटीआय) वाढ होण्याचं प्रमाण वाढतं. अति उष्णता, निर्जलीकरण आणि तापमानात होणारे चढउतार हे घटक या संसर्गात वाढ होण्यास कारणीभूत ठरतात. वेळीच निदान आणि उपचार केल्यास 'यूटीआय'चं व्यवस्थापन करण्यास मदत होऊ शकते.

मूत्रमार्गाचा संसर्ग हा मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशयासह मूत्रमार्गाच्या कोणत्याही भागात आढळू शकतो. लघवी करताना जळजळ होणं, फेस किंवा दुर्गंधीयुक्त लघवी होणं, वारंवार लघवी करण्याची इच्छा होणं, लघवीवाटे रक्त जाणं, ताप येणं आणि ओटीपोटात वेदना होणं ही याची लक्षणे आहेत. 'यूटीआय'वर वेळेत उपचार न केल्यास पायलोनेफ्रायटिस (किडनी संसर्ग) किंवा सेप्सिससारखी गंभीर गुंतागुंत निर्माण होऊ शकते. उन्हाळ्यात हा त्रास टाळायचा असेल, तर शरीर हायड्रेटेड राखणं, स्वच्छतेच्या सवयींचं पालन करणं, सुती अंतर्वस्त्रांचा वापर करणं आणि जास्त काळ लघवी रोखून न धरणं या गोष्टी कटाक्षाने पाळायला हव्यात.

उन्हाळ्यात डिहायड्रेशन होतं. त्यामुळे मूत्रमार्गाच्या संसर्गाचा धोका वाढतो. शरीरात पुरेसे द्रवपदार्थ नसतात, तेव्हा मूत्राशयातून विषारी पदार्थ आणि जीवाणू बाहेर काढता येत नाहीत. त्यामुळे संसर्ग होतो. उष्ण आणि दमट हवामान जीवाणूंच्या वाढीसाठी आदर्श वातावरण असतं. जास्त घाम येणं देखील जीवाणूंच्या वाढीस चालना देतं. 'यूटीआय'ला कारणीभूत ठरणारा सर्वात सामान्य जीवाणू म्हणजे एस्चेरिचिया कोलाई (ई. कोलाई). हा जीवाणू आतड्यांमध्ये आढळतो; परंतु तो मूत्रमार्गात गेला तर संसर्गास कारणीभूत ठरू शकतो. महिलांच्या मूत्रमार्गाची लांबी कमी असते, त्यामुळे जीवाणू मूत्राशयापर्यंत सहज पोहोचतात. म्हणून महिलांमध्ये 'यूटीआय' संसर्गाची शक्यता अधिक असते.



जीवनशैली


डॉ. कुंदन गायकवाड

प्रौढांमध्ये 'यूटीआय' संसर्गाचं प्रमाण ३० टक्क्यांनी वाढलं आहे. या रुग्णांच्या निदानासाठी मूत्र आणि रक्त तपासणीचा सल्ला दिला जातो. 'यूटीआय' टाळण्यासाठी, हायड्रेटेड राहणं, वेळोवेळी मूत्राशय रिकामं करणं, लघवी रोखून न ठेवणं, मूत्राशयावर परिणाम करणारे कॅफिन आणि अल्कोहोलचं सेवन कमी करणं आणि नाजूक भागाची चांगली स्वच्छता राखणं गरजेचं आहे.

## तरुणांमध्ये वाढतात यकृताचे आजार

२३ ते ३५ वयोगटातील, विशेषतः टाइप २ मधुमेहग्रस्त तरुणांमध्ये हिपॅटायटीस, फॅटी लिव्हर आणि सिरॉसिससारखे यकृताचे आजार वाढत आहेत. तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार मधुमेहींमध्ये यकृताशी संबंधित गुंतागुंतीची वाढती संख्या हे चिंतेचे कारण ठरत आहे आणि त्यासाठी वेळीच उपचार करणं आवश्यक आहे. तरुणांमध्ये 'नॉन–अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज' आणि लिव्हर सिरॉसिसच्या प्रकरणांमध्ये वाढ होत आहे.

मधुमेहामुळे यकृताला जखमा (फायब्रोसिस) होतात. त्याचं योग्य व्यवस्थापन केलं नाही, तर सिरॉसिसची समस्या होते. म्हणूनच, यकृताचं दीर्घकालीन नुकसान टाळण्यासाठी आणि जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी वेळीच तपासणी, जीवनशैलीत बदल आणि मधुमेहाचं नियंत्रण करणं आवश्यक आहे.



लठ्ठपणा, मधुमेह, फॅटी लिव्हर आणि उच्च कोलेस्ट्रॉलने पीडित रुग्णांचं प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

'मेटॅबॉलिक डिसफंक्शन–असोसिएटेड लिव्हर डिसीज'मुळे यकृताचे अधिक गंभीर विकार (सिरोसिस, यकृतास होणारी जखम) होऊ शकतात आणि वेळीच उपचार न केल्यास ते यकृताच्या कर्करोगास कारणीभूत ठरू शकतात. सुरुवातीच्या टप्प्यात हे आजार रोखता येतात आणि बरेदेखील होतात. तरुणांमध्ये यकृताच्या विकारांत वाढ होण्याची बैठी जीवनशैली, शारीरिक हालचालींचा अभाव, पुरेशी झोप न घेणं, खाण्याच्या सवयी (अल्ट्रा–प्रोसेस्ड फुड, आहारातील कार्बोहायड्रेट्सचं वाढतं प्रमाण) आणि व्यसन ही महत्त्वाची कारणं आहेत.

मधुमेह स्वादुपिंडाबरोबरच यकृतावरही परिणाम करतो. रक्तातील ग्लुकोजची उच्च पातळी, आहाराच्या चुकीच्या सवयी आणि बराच वेळ एकाच ठिकाणी बसून राहिल्याने यकृत आणि स्वादुपिंडात चरबी जमा होते. त्यामुळे यकृताची जळजळ होण्याची आणि व्रण उमटण्याची शक्यता वाढते. कालांतराने, यामुळे सिरॉसिस होतो. लिव्हर सिरॉसिस झाल्यावर यकृत बरं होऊ शकत नाही. २३ ते ३५ वयोगटातील ३० टक्के तरुण मधुमेहाशी झुंजत आहेत. आधीच मधुमेह असलेल्या तरुणांमध्ये आणि यकृताच्या समस्यांमध्ये सुमारे १५ टक्के वाढ झाली आहे.

जीवनशैली

यकृताच्या व्याधी टाळण्यासाठी आहारात फायबरयुक्त पदार्थांचा समावेश तसंच साखर आणि चरबीचं प्रमाण कमी राखणं गरजेचं आहे. फळं आणि भाज्या, तृणधान्य आणि ऑलिव्ह ऑइलचा वापर केल्यास यकृताचं आरोग्य चांगलं राहतं. कंबरेचा घेर अधिक असेल तर जीवनशैलीतील बदलांसह (शारीरिक हालचाल, व्यायाम) निरोगी आहाराच्या सवयींचा अवलंब करणं आणि वजन पाच ते दहा टक्क्यांनी कमी केल्यास फॅटी लिव्हरच्या प्रमाणात घट होऊ शकते. योग्य आहारामुळे भविष्यात यकृताचा विकार होण्याचा धोका सुमारे ५० टक्क्यांनी कमी होऊ शकतो.

### नवसंशोधन

### मेंदू असतो लहान

इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉरमेशन अँड टेक्नॉलॉजी हैदराबादच्या शास्त्रज्ञांनी भारतीयांच्या मेंदूचा नकाशा तयार केला आहे. हा अशाप्रकारचा पहिलावहिला नकाशा आहे. भारतीयांचा मेंदूचा आकार इतरांच्या तुलनेत लहान असल्याची बाब या संशोधनातून समोर आली आहे. पाश्चिमात्य देश तसंच पूर्वेकडच्या इतर देशांमधल्या लोकांच्या तुलनेत भारतीयांच्या मेंदूचा आकार बराच लहान असतो. या संशोधनामुळे अल्झायमर तसंच मेंदूशी संबंधित इतर विकारांवरील उपचारांना गती मिळू शकते.



### दंतारोग्य

### दात पांढरेशुभ्र होतात का?

दातांचा पांढरेपणा टिकवून ठेवण्यासाठी विविध प्रक्रिया केल्या जातात. दातांचा पिवळेपणा दूर करणाऱ्या प्रक्रियेबाबत बरेच गैरसमज आहेत. या प्रक्रियेनंतर दात पांढरेशुभ्र होतात, असा समज असतो. मात्र या प्रक्रियेचे लाभ व्यक्तीगणिक बदलत जातात. दागांचे प्रकार, दातांवरच्या एनामेलचा थर, दातांची क्षमता यावर बरंच काही अवलंबून असतं. त्यामुळे दात पूर्ण पांढरे होतीलच असं नाही.



### डोळ्यांचे आरोग्य

### डोळे दुखत असतील तर...

लॅपटॉप आणि कॉम्प्युटरचा वापर केल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो. डोळे दुखू लागतात. मात्र काही उपायांनी आपण हा ताण कमी करू शकतो. सतत स्क्रीनपुढे राहिल्याने डोळे दुखू लागले तर डोळ्यांवर थंड पाण्याचे हबके मारावेत. योगामुळेही आराम मिळू शकतो. आहारात डाळी, हिरव्या भाज्या, गाजर यांचा समावेश असावा.



### आजीबाईचा बटवा

### शिळी पोळीही आहे गुणकारी

शिळ्या किंवा उरलेल्या पोळ्यांची फोडणीची पोळी केली जाते. मात्र बऱ्याच घरांमध्ये अशा उरलेल्या पोळ्या टाकून दिल्या जातात. अर्थात या शिळ्या पोळ्या अधिक लाभदायी ठरतात. या शिळ्या पोळ्यांमध्ये विविध आजार बरे करण्याची क्षमता असते.



या पोळ्यांमध्ये ताज्या पोळ्यांच्या तुलनेत प्रथिनांचं प्रमाणही अधिक असतं. शिळ्या पोळ्यांमुळे रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात रहाते. मधुमेहींना सकाळच्या वेळी दुधासोबत शिळी पोळी खाता येईल. शिळ्या पोळीच्या सेवनामुळे रक्तदाबही नियंत्रणात रहातो. त्यामुळे शिळी पोळी टाकून देऊ नये.

# ट्रकवर धडकली इर्टीगा कार : तीन ठार

■ महासागर प्रतिनिधी, नांदुरा, दि. १३ :
उज्जैन येथून देवदर्शन आटोपून गावाकडे परत जात असताना रस्त्यावर उभ्या नादुरूस्त ट्रकवर इर्टिगा कार धडकून झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू झाला तर ५ जण जखमी झाले त्यातील दोघांची प्रकृती गंभीर आहे. ही घटना सोमवारच्या मध्यरात्री घडली.

नांदुरा पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, निलेश आंदुसिंग राठोड (वय ४२), रा नाईक नगर हेटी, तालुका आर्णी, जि यवतमाळ हे त्यांच्या नातेवाईकांसह उज्जैन येथून देवदर्शन करून इर्टिगा कारने गावाकडे परत येत असताना खामगाव बायपासच्या खातखेड फाट्याजवळ ट्रकच्या टायरचा रिमोट पट्टा निघाल्याने ट्रक रस्त्याच्या मधोमध उभा होता. ट्रकचे इंडिकेटर सुद्धा बंद होते.

दरम्यान, इर्टीगा चालकाला उभ्या ट्रकचा अंदाज न आल्याने कार ट्रकवर जाऊन आदळली. या अपघातात देवराव गंगाराम पवार (वय ६०), बबीता देवराव पवार (वय ५५), निकेतन देवराव पवार (वय २६), रा लोकरवाडी ता. माहुर, जि. नांदेड हे तिघे जागीच ठार झाले.

मोनिका जीवन राठोड (वय ३२), रा किनवट, भूमिका रामराव राठोड (वय १८), प्रियंका देवराव पवार (वय ३०), रा किनवट, हिताशी जीवन राठोड (वय २), रा किनवट आणि इर्टीगा चालक संतोष भगवान कदम (वय ३९), रा करंजी, ता. माहुर, जि नांदेड हे पाच जण जखमी झाले.



अपघाताची माहिती मिळताच नांदुराचे ठाणेदार विलास पाटील, हेकॉ काशीनाथ जाधव, वाहतूक शाखेचे वाघमारे यांच्यासह १०८ रुग्णविहिकेचे डॉ शेख, चालक गणेश वनारे यांनी घटनास्थळी धाव घेत अपघातातील जखमींना खामगाव येथील शासकीय रुग्णालयात हलविले.

याप्रकरणी आरोपी ट्रक चालकाविरुद्ध नांदुरा पोलीस स्टेशन येथे विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून या प्रकरणाचा पुढील तपास हेकॉ उमेश भारसाखळे हे करीत आहेत. शवविच्छेदनानंतर तिन्ही मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आले

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी
# भाजपची जोरदार तयारी
### ३६ जिल्ह्यांसाठी ५८ जिल्हाध्यक्ष घोषित

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने मंगळवारी महाराष्ट्र प्रदेशातील संघटनात्मक जिल्ह्यांसाठी ५८ जिल्हाध्यक्षांच्या नावांची घोषणा केली. यात स्थानिक पातळीवरील अनेक महत्त्वाच्या नेत्यांच्या हाती जिल्ह्याच्या राजकारणाची चावी देण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिस स्वराज्य संस्थांची निवडणूक चांगलीच रंगतदार होण्याची शक्यता आहे.

सुप्रीम कोर्टाने नुकतेच राज्य निवडणूक आयोग व सरकारला पुढील ४ महिन्यांच्या आत घेण्याचे आदेश दिलेत. ही निवडणूक २०२२ च्या राजकीय आरक्षणासह होणार आहे. त्यानुसार, सर्वच राजकीय पक्ष या निवडणुकांच्या तयारीला लागलेत. या पार्श्वभूमीवर भाजपने राज्यातील ३६ जिल्ह्यांसाठी ५८ जिल्हाध्यक्षांच्या नावांची घोषणा केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती प्रक्रिया पार पडली. भाजपने मुंबईसाठी उत्तर, उत्तर पूर्व व उत्तम मध्य अशा 3 जिल्हाध्यक्षांची नियुक्ती केली आहे. या तिन्ही विभागांची जबाबदारी अनुक्रमे दीपक तावडे, दीपक दळवी व विरेंद्र म्हात्रे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

याशिवाय नांदेड महानगरची जबाबदारी अशोक चव्हाण यांचे विश्वासू अमर राजूरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर पुण्याच्या शहराच्या जिल्हाध्यक्षपदी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय धीरज घाटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय, सिंधुदुर्गच्या जिल्हाध्यक्षपदी प्रभाकर सावंत, भिवंडीच्या रविकांत सावंत, साताऱ्याच्या जिल्हाध्यक्षपदी प्रकाश ढंग, सांगली ग्रामीणसाठी सम्राट महाडिक, हिंगोलीच्या जिल्हाध्यक्षपदी गजानन घुगे, नंदुरबारसाठी निलेश माळी, अहिल्यानगर उत्तरच्या जिल्हाध्यक्षपदी नितीन दिनकर, अहिल्यानगर दक्षिणच्या जिल्हाध्यक्षपदी दिलीप भालसिंग यांची नियुक्ती करम्यात आली आहे.

याशिवाय बुलढाणाच्या जिल्हाध्यक्षपदी विजयराज शिंदे, खामगाव सचिन देशमुख, अकोला महानगर जयवंतराव मसणे, वाशिम पुरुषोत्तम चितलांगे, यवतमाळ प्रफुल्ल चव्हाण, नागपूर महानगर दयाशंकर तिवारी, नागपूर ग्रामीण (रामटेक) अनंतराव राऊत व नागपूर ग्रामीण (काटोल) मनोहर कुंभारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, सरकार त्यांच्या पाठीशी..

■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. १३ :
शेतकऱ्यांना कुठेही वाऱ्यावर सोडणार नाही. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणार आहे, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.



तसेच अवकाळी पावसाच्या नुकसानी संदर्भात सर जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या असून छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी मी स्वतः बोललो आहे, तातडीने पंचनामे होतील, असेही एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे.

सोमवारी चिखली तालुक्यातील इसरूळ येथे जाण्यासाठी एकनाथ शिंदे छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळावर आले होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानावर भाष्य केले.

## राज्यस्तरीय साहित्य रत्न पुरस्काराने तडकाकार अशोक सारडा सन्मानित




■ महासागर प्रतिनिधी, मेहकर, दि. १३ :
महेश मंत्र जालनाच्या रजत महोत्सवानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमात विविध क्षेत्रात प्रशंसनिय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिंना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष रमाकांत व्यास यांच्या हस्ते मेहकर येथील कवी, स्तंभलेखक, तडकाकार, पत्रकार प्रा. अशोक सारडा यांच्या समाज प्रबोधनपर अष्टपैलू लिखाणाची दखल घेत साहित्य रत्न हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रमुख अतिथींच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. आयोजक समितीचे प्रमुख संपादक नंदलाल राठींनी मनोगत व्यक्त केले.

# निकालात अकोल्याची घसरण

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १३ :
दहावीच्या परीक्षा निकालात देखील अकोला जिल्ह्याची घसरणच झाली. अकोला जिल्ह्याचा ८९.३५ टक्के निकाल लागला असून अमरावती विभागात जिल्हा तळाशीच आहे. या निकालावरही मुलींचा वरचष्मा कायम आहे. ९३.८९ टक्के मुली, तर ८५.२४ टक्के मुले उत्तीर्ण झाले आहेत.

दहावीच्या परीक्षेसाठी अकोला जिल्ह्यातून २५ हजार ४४९ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी २५ हजार २२९ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. त्यातील २२ हजार ५४४ म्हणजेच ८९.३५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. १३ हजार २४७ मुले, तर ११ हजार ९८२ मुलींनी दहावीची परीक्षा दिली होती.

त्यातील ११ हजार २९३ मुले आणि ११ हजार २५२ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांच्या उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८५.२४, तर ९३.८९ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या. अकोला जिल्ह्यात सर्वाधिक ९५.४७ टक्के निकाल पातूर तालुक्याचा लागला. अकोला तालुक्याचा ९०.५४, अकोट ८६.४४, तेल्हारा ८७.०८, बार्शीटाकळी ९०.३५, बाळापूर ८६.९५ व मूर्तिजापूर ८८,१२ टक्के निकाल लागला आहे.

**५६२८ विद्यार्थी प्रावीण्यासह उत्तीर्ण**

अकोला जिल्ह्यात दहावीच्या परीक्षेत पाच हजार ६२८ विद्यार्थी प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले. सहा हजार ६५९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, सात हजार ५३४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत, तर दोन हजार ७२३ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. बाल शिवाजी शाळेचा १०० टक्के निकाल बाल शिवाजी माध्यमिक शाळेचा १०० टक्के निकाल लागला. एकूण ८७ पैकी ८० विद्यार्थ्यांनी प्रावीण्य प्राप्त केले.

५७ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण आहेत. पयोष्णी विक्रम घाईट हिने १०० टक्के गुण मिळवत शाळेतून प्रथम आली आहे. ईश्वरी गणेश डांगे ९९.८० टक्के द्वितीय तर, परिमल दीपक ठाकरे याने ९८.६० टक्के गुण मिळवून शाळेतून तृतीय क्रमांक पटकावला. संस्कृत विषयात २१ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण, गणित विषयात पाच विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण, विज्ञान विषयात दोन, समाजशास्त्र, इंग्रजी व मराठी विषयात प्रत्येकी एका विद्यार्थ्याने पैकीच्या पैकी गुण प्राप्त केले आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापनाने कौतुक केले.

# यवतमाळचा निकाल ९१.५१ टक्के

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. १३ :
आज मंगळवारी घोषित करण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत यवतमाळ जिल्ह्याचा निकाल ९१.५१ टक्के इतका लागला. जिल्ह्यातून या परीक्षेला ३८ हजार २६२ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३७ हजार ८२० विद्यार्थ्यांनी १५९ केंद्रांवरून प्रत्यक्ष परीक्षा दिली. त्यापैकी ३४ हजार ६१२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

दहावीत १९ हजार ८७९ मुले परीक्षेला बसली होती. त्यापैकी १७ हजार ६९३ मुले उत्तीर्ण झाली. तर १७ हजार ९४१ मुलींपैकी १६ हजार ९१९ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.

मुलांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८९ इतकी असून मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.३० इतकी आहे. दहावीच्या परीक्षेतही मुलींनीच बाजी मारली आहे. बारावीच्या परीक्षेतही जिल्ह्यात मुलींनी बाजी मारली होती.

# बुलढाण्याचा निकाल ९२.५२ टक्के

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १३ :
इयत्ता दहावी, बारावीच्या निकालात अमरावती विभागात आघाडीवर राहण्याची दिमाखदार परंपरा बुलढाणा जिल्ह्याने कायम राखली आहे. आज ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या निकालात बुलढाणा जिल्हा अमरावती विभागात प्रथम आला आहे. बुलढाणा जिल्ह्याने ९५.५२ टक्के निकालासह अमरावती विभागात अव्वल स्थान पटकावले आहे.

आज १३ मे रोजी दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला. जिल्ह्यातील ३८ हजार ९९६ पैकी तब्बल ३७, २५२ विद्यार्थी उत्तीर्ण झालेत.

यंदा दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान घेण्यात आली होती. यंदाही ही परंपरा कायम आहे. मुलींची टक्केवारी ९६.९७ इतकी असून त्या तुलनेत मुलांची टक्केवारी ९४. ७४ इतकी आहे.

# वाशीम जिल्ह्यात मुलींचाच डंका



■ महासागर प्रतिनिधी,वाशिम, दि. १३ :
इयत्ता दहावीच्या परीक्षा निकालात वाशीम जिल्हा अमरावती विभागात दुसऱ्या स्थानावर राहिला आहे. वाशीम जिल्ह्याचा ९५.४१ टक्के निकाल लागला. या निकालातही मुलींचा दबदबा कायम आहे. ९७.१० टक्के मुली, तर ९४.०९ टक्के मुले उत्तीर्ण झाले आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला. दहावीच्या परीक्षेसाठी वाशीम जिल्ह्यातून १९ हजार ८६७ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते.

त्यापैकी १९ हजार ६९५ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. त्यातील १८ हजार ७९२ म्हणजेच ९५.४१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

११ हजार ०६६ मुले, तर आठ हजार ६२९ मुलींनी दहावीची परीक्षा दिली होती. त्यातील १० हजार ४१३ मुले आणि आठ हजार ३७९ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांच्या उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९४.०९, तर ९७.१० टक्के मुली उत्तीर्ण झाल्या. वाशीम जिल्ह्यात सर्वाधिक ९६.७५ टक्के निकाल रिसोड तालुक्याचा लागला. वाशीम तालुक्याचा ९५.११, मालेगाव ९५.९८, कारंजा ९५.६५, मंगरुळपीर ९३.८९ व मानोरा ९४.६८ टक्के निकाल लागला आहे.

## प्रधानमंत्री मोदींनी पाकला त्याच्या घरात घुसून मारले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
भारताने पाकविरोधात केलेली कारवाई हा केवळ ट्रेलर आहे. संपूर्ण पिक्चर अजून बाकी आहे, असे सूचक विधान भाजप प्रदेशाध्यक्ष तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पहलगाम हल्ल्यानंतर पाकविरोधात करण्यात आलेल्या कारवाईवर भाष्य करताना केले आहे.



बावनकुळे पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, पाक अतिरेक्यांनी २८ पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून ठार मारले. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकच्या त्या नक्षलवाद्यांना त्यांच्या घरात जाऊन मारले. घरात घुसून मारले. आता त्यांनी पाकवर कठोर निर्बंध लादलेत. त्यांनी आता पाकला ठणकावून सांगितले आहे की, भारतात एक जरी नक्षलवादी कारवाई झाली, तरी त्याला युद्ध समजले जाईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत किती बलशाली आहे तो काय करू शकतो हे संपूर्ण जगाला दाखवून दिले. हा फक्त ट्रेलर होता. संपूर्ण पिक्चर अजून बाकी आहे. यानंतर या देशाशी कुणी बदमाशी करेल, बेईमानी करेल, छेडण्याचा प्रयत्न झाला तर हा देश बदला घेतल्याशिवाय राहणार नाही. आमचे सैन्य बदला घेतल्याशिवाय राहणार नाही, असे ते म्हणाले.

खरे तर मोदींनी ज्या पद्धतीने देशाला वाचवण्यासाठी देशाच्या नागरिकांना वाचवण्यासाठी जी भूमिका घेतली ती अतिशय महत्त्वाची आहे. मोदींच्या कालच्या संबोधनानंतर त्यांना देशातील १४० कोटी जनतेचे पाठबळ त्यांना मिळाले आहे. त्याविषयी त्यांनी जनतेप्रती कृतज्ञता व्यक्त केली, असेही ते यावेळी म्हणाले.

**: मुलखांवेगळी माणस :**

# कल्पृक्षापासून कल्पक वस्तूची निर्मिती

नारळाला कल्पवृक्ष असे संबोधले जाते. जगातील प्रमुख नारळ उत्पादक देशांचा समावेश असलेल्या एशियन अँण्ड पॅसिफिक कोकोनेट कम्युनिटी या संघटनेने (एपीसीसी) ने २००९ मध्ये दोन सप्टेंबर हा दिवस जागतिक नारळ दिन म्हणून साजरा करण्याचे घोषित केले.

त्या माध्यमातून जागतिक नारळ शेती व उद्योगाचे महत्त्व व विस्तार वाढीस अजून चालना मिळाली. भारत हा देखील नारळ उत्पादक देश असून कोकणातील शेतकऱ्यांचे ते अर्थकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचे पीक आहे. कोकणातील भोगवे (जि. सिंधुदुर्ग) येथील राजाराम प्रभू यांनी नारळाच्या विविध भागांपासून कलात्मक, गृहोपयोगी वस्तू निर्मितीचे कौशल्य आत्मसात करून नारळाचे मूल्यवर्धन साधले आहे. सुमारे ५० हून अधिक प्रकारच्या वस्तू तयार करून व्यवसायाला चालना देत आर्थिक उलाढाल वाढवली आहे. कृषी पर्यटन केंद्राच्या उभारणीतून त्याला मोठा आधार मिळाला आहे.




लोकमानस

लहानपणी गुरे राखण्यासाठी प्रभू जायचे. अंगभूत कला कौशल्य, सर्जनशीलता व नवे काही करण्याची आस असलेले प्रभू माळरानावरील गवत, झाडांची मुळे यापासून काहीतरी कलाकृती वा वस्तू बनविण्याचा प्रयत्न करायचे. विहीर खोदताना त्यांना एक दगड आढळला. त्यापासून आकर्षक पुतळा तयार केला. जंगलात फिरताना एकदा कुंबया वनस्पतीचे सुकलेले मोठ्या आकाराचे मूळ दिसले. त्यापासून ॲनाकोंडा अजगराची प्रतिकृती तयार केली. ती खूप आकर्षक झाली होती. पण त्याचे मूळ कुजल्याने ती फार दिवस टिकू शकली नाही. पण इथेच प्रभू यांच्या कलाकारीला अधिक चालना मिळाली.

बागेतील नारळांच्या विक्रीतून उत्पन्न मिळायचे. पण त्याच्या झावळ्या, करवंट्या, सोडणी आदी वाया जाणाऱ्या बाबींचे मूल्यवर्धन करून त्यापासून गृहोपयोगी वस्तू तयार करण्याचा छंद त्यांना जडला. त्यातून एकेक करीत आजमितीला पन्नासहून अधिक प्रकारच्या वस्तूंचा जन्म झाला आहे.

प्रभू यांनी नारळाच्या झावल्यापासून समई, पेन स्टॅन्ड, चहाचा कप, घरटे, कंदील, टोपी, वाइन ग्लास, बाउल, चमचे, राखी, फुलदाणी अशा शोभेच्या वस्तू तयार केल्या आहेत तर झावळांपासून आंबा बॉक्स (एक ते दोन डझन क्षमता). त्याचे वरचे आवरण सुपारीच्या पोयीपासून तयार केले.

झावळ्यांपासून आंबा करंडी देखील. त्यात दोन- तीन डझन आंबे सहज राहतात. पर्यावरणपूरक व दिसायला अतिशय सुंदर असल्याने देशी- परदेशी पर्यटकांना ती भुरळ घालते आहे. झावळ्यांपासून आकर्षक हिरव्या रंगाची टोपी. जिच्या प्रेमात परदेशी पर्यटक पडले आहेत.

या वस्तूंच्या किमती प्रकार व गुणवत्तेनुसार ५० रुपयांपासून ते १ हजारांपर्यंत आहेत. पर्यटन केंद्रात येणारे ग्राहक वस्तू खरेदी करतात. स्थानिक ठिकाणीही विक्री होते. दिवाळी, सुट्टी व उन्हाळी सुट्टी हे मुख्य हंगाम असतात. हा काळ पकडला तर एक लाखांपर्यंत उलाढाल वस्तू विक्रीतून होते.मुख्य म्हणजे कोणत्याही यंत्रांचा आधार न घेता केवळ हस्तकौशल्यातून वस्तू तयार केल्या आहेत. तारकर्ली येथील एका व्यावसायिकाकडे प्रभू यांच्या वस्तू विक्रीसाठी होत्या. एका पर्यटकांकडून माशांच्या प्रतिकृतीची मागणी झाली. मात्र तशी तयार केलेली नव्हती.

मात्र हे आव्हान स्वीकारून नारळाच्या झावळ्यांपासून तशी प्रतिकृती बनवण्यात प्रभू यशस्वी झाले. एका परदेशी पर्यटकाला ती पसंत पडून त्याने चांगली किमतही दिली. एकूणच, नारळा सारख्या कल्पृक्षापासून प्रभू यांनी शोभेच्या वस्तू बनवत स्वताला आगळा वेगळा कलाकार म्हणून सिध्द केले आहे.

■ ■ ■

**: वाद संवाद :**

## मराठी शाळांच्या दुरावस्थेला जबाबदार कोण?

■ विद्या भट, शिक्षिका

'मुंबई मराठी माणसाची,नाही कुणाच्या बापाची' असे नारे देत एकेकाळी महाराष्ट्राशी जोडल्या गेलेल्या मुंबईत गेल्या सहा वर्षांमध्ये मराठी माध्यमांच्या सुमारे ४० शाळांना टाळे लागलेले आहे. या ४० शाळांमधील सुमारे ५० हजाराहून अधिक मुलांनी मराठी ऐवजी इतर किंवा इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश घेतला आहे. हि अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर बाब आहे. याचे कारण म्हणजे आजच्या जागतिकीकरणाच्या प्रचंड रेट्यात इंग्रजी भाषा हि सर्वार्थाने महत्वाची भाषा ठरलेली आहे. शालेय स्तरावरच विद्यार्थी जर इंग्रजी शिकतील तर पुढे उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन स्तरावर आणि करिअर याकरिता देखील इंग्रजी महत्वाची असल्याने पालकांचा भर हा इंग्रजी शाळांकडे दिसतो. हा काळाचा महिमा आहे आणि तोही अपरिहार्य आहे. याला जबाबदार कुणालाही धरता येणार नाही.

■ सुरेश नारखेड, ग्रंथपाल

अमृताते पैजा जिंकणारी अशी आपली मराठी भाषा आहे हे अनेकदा वाचून आणि ऐकून झालेले असले तरी आजकाल प्रत्येक मराठी कुटुंबाला अगदी गरिबांना देखील आपला पाल्य हा इंग्रजी हायफाय शाळेत शिकायला हवा असेच वाटते. त्यामुळे अगदी सरकारने मराठी शाळांना मोफतच्या अनेक सवलती देऊन सुद्धा पालक आपल्या मुलांना मराठी शाळांमध्ये घालायला तयार नाहीत हे वस्तुस्थिती आहे आणि शोकांतिका देखील. परंतु असं असलं तरी प्रत्येक शाळेत सरकारने मराठी विषय हा सक्तीचा करायला हवा आणि तसा आदेश द्यावा असं वाटत. त्यामुळे आपली मायबोली किमान आपलीच मुलं बोलू शकतील.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## डिफेंडरची पहिली रॅली-रेड प्रोटोटाइप चाचणी पूर्ण

मूळ ब्रिटिश साहसी ब्रँड डिफेंडरने मोरोक्कोमध्ये डिफेंडर डाकार D7X-R सह प्रोटोटाइप चाचणी पूर्ण करून जागतिक रॅली-रेड चॅम्पियनशिप मध्ये प्रवेश करण्यासाठी तयारी वेगवान केली आहे, तसेच दोन उत्कृष्ट ड्रायव्हर्सना करारबद्ध केले आहे. चौदा वेळा डाकार रॅली विजेता स्टीफन पीटरहॅन्सेल उदयोन्मुख प्रतिभा रोकास बासियुस्का सोबत अंतिम साहसासाठी डिफेंडर रॅली संघात सामील होईल. फ्रेंच ड्रायव्हर पीटरहॅन्सेल मोरोक्कोमधील डिफेंडर रॅली संघात सामील झाला.

क्षमता आणि टिकाऊपणासाठी डिझाइन आणि इंजिनिअर केलेला डिफेंडर, आयकॉनिक आणि AMXT 4x4, डकार रॅलीमध्ये त्याचे काम पदार्पण करेल, जिथे तीन डिफेंडर डाकार D7X-Rउत्पादन-आधारित कारसाठी 'स्टॉक' श्रेणीमध्ये स्पर्धा करतील. २०२६ च्या FIA वर्ल्ड रॅली-रेड चॅम्पियनशिपच्या उर्वरित फेऱ्यांमध्ये दोन कारची एंट्री स्पर्धा करेल. ■



# बापरे... ताडोबा व्याघ्र प्रकल्पात ६3 वाघोबा!

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १३ :
बौद्ध पौर्णिमेच्या चांदण्या रात्री ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोर व बफर क्षेत्रात निसर्ग अनुभव कार्यक्रमात बफर व कोर क्षेत्रात ६३ वाघ, १३ बिबट्यासह अस्वल, हरिण, निलगाय, चौशिंगा, कोल्हा, कोंबडी, मोर यांच्यासह दोन्ही क्षेत्रात एकूण ५ ५०२ वन्यप्राण्यांची नोंद घेण्यात आली. बफरच्या ८१ मचाणीवर १६२ पर्यटक तर कोर क्षेत्रात ९६ मचाणीवर वन अधिकारी सहभागी झाले होते.



ताडोबा व्यवस्थापनाने पंधरा दिवसापूर्वी पासून याची तयारी सुरू केली होती. यासाठी बफर क्षेत्रातील ८१ मचाणी सज्ज करण्यात आल्या असून ६ वनपरिक्षेत्रात ही गणना होत आहे. मचाणीचा अनुभव घेण्यासाठी ऑनलाईन नोंदणीची सुविधा करण्यात आली होती. त्यानुसार १६२ पर्यटकांची निवड करण्यात आली. पर्यटकांना सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत वनविभागाच्या मदतीने १६ प्रवेशद्वारांवरून मचाणीवर पोहचवले. बफर व कोर दोन्ही मिळून ६३ वाघांची नोंद घेण्यात आली तर १३ बिबटे दिसले. यासोबतच अस्वल ९३, रानकुत्रा ९६, मुंगूस १००, रानमांजर ७, चौशिंगा २७, माकड ८५७, सांबर ५५३, रानगवा ८८२, रानडुकर ३८१, चितळ १७३७, निलगाय ८७, मोर ५५१, रानकोंबडा ५३, ससा १४, सायळ २७, चिंकारा १३, तडस १, उडती खार ५, उदमांजर ५०, जवादी मांजर २९, मगर ६, चांदी अस्वल ३, भेडकी ९८ व इतर ५६ प्राणी दिसून आले.

कोर क्षेत्रात सर्वाधिक ३ हजार ७४६ तर बफर क्षेत्रात १७५६ वन्यप्राणी दिसले, दोन्ही मिळून ५ हजार ५०२ प्राणी नोंद घेण्यात आली अशी माहिती मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी दिली.

पूर्वी व्याघ्रगणाना प्रक्रिया सामान्य नागरिकांसाठी निःशुल्क होती. मात्र काही वर्षांपासून यावर आता शुल्क आकारण्यात येत आहे. त्यातही हा मचाणीचा अनुभव ताडोबा व्याघ्रप्रकल्पात सर्वाधिक महागडा आहे. यासाठी प्रति व्यक्ती साडे चार हजार शुल्क आकारण्यात आले. त्यामुळे सामान्य नागरिकांसाठी हे परवडण्यासारखे नाही. शिवाय स्थानिक नागरिकांना देखील यात कुठलीही सूट नाही. त्यामुळे मागील दोन वर्षांपासून सातत्याने शुल्क आकारण्यावरून वाद होत आहे.

बौद्ध पौर्णिमेला रात्रीचा प्रकाश हा सर्वाधिक असतो. या स्वच्छ प्रकाशात पाणवठ्यावर येणारे प्राणी सहज बघितले जाऊ शकतात. इंग्रजकालीन काळात व्याघ्रगणनेसाठी या पद्धतीचा उपयोग केला जायचा.

आता व्याघ्रगणनेसाठी जीपीएस, ट्रॅप कॅमेरे, वाघाचे ठसे अशा आधुनिक आणि अद्यावत प्रणालीचा उपयोग करून ही प्रक्रिया केली जाते. मात्र असे असतानाही सामान्य नागरिकांना याचा अनुभव घेता यावा यासाठी अजूनही ही पारंपरिक पद्धत सुरू ठेवण्यात आली आहे.